# बुधवार पेठ



निर्मिती: **संपदा ग्रामीण महिला संस्था. मीना सेशू आणि आरती पै**

समन्वय व प्रशासकीय सहाय्य: **सहेली संघ. तेजस्वी सेवेकरी आणि सहेली संघ चे कर्मचारी व कार्यकारणी मंडळ.**

संशोधन मार्गदर्शक: **लक्ष्मी मूर्ती**
संशोधन सहाय्यक: **मीना सेशू, आरती पै आणि तेजस्वी सेवेकरी**
अभ्यास मुलाखती व लेखन: **संयोगिता ढमढेरे व विद्या कुलकर्णी**
संपादन: **वसंत भोसले**
मुखपृष्ठ, चित्रे व मांडणी: **श्रुती मगदूम**

प्रकाशन: **संपदा ग्रामीण महिला संस्था (संग्राम)**
प्रकाशन: **ऑक्टोबर २०२१**

# बुधवार पेठ

## सेक्स वर्कर्सच्या नजरेतून बुधवार पेठेचा मौखिक इतिहास






**शकुंतला ताई**

**बुधवार पेठ मौखिक इतिहास पुस्तक**
**शकुंतला ताईंना समर्पित**

पूर्ण नाव शकुंतला पवार. महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातून एका खेडेगावातून बुधवार पेठेत, पुण्यात आलेली एक स्त्री! जिने तिच्या कर्तुत्वाने, अतिशय प्रभावीपणे वेश्या व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींचे हक्क मिळविण्यासाठी त्यांचे नेतृत्व करून स्वतःला सिद्ध केले. पुण्यातील एक मात्र अशा वेश्याव्यवसाय करणाऱ्या महिलांच्या संघटना, सहेली संघाच्या, त्या संस्थापक सदस्य होत्या.

१९९१ पासून २०२० एवढी वर्षे सलग त्यांनी सहेलीच्या पूर्ण जडणघडणीत आणि नेतृत्वामध्ये अतिशय महत्त्वाची भूमिका पार पाडली होती. एच आय व्ही एड्स प्रतिबंध व नियंत्रण ते वेश्याव्यवसाय हे आमचे काम आहे अशा मागणी पर्यंतचा त्यांचा प्रवास खूपच रंजक आणि निरनिराळ्या धाडसी कृती आणि कार्यक्रमांनी भरून गेलेला होता. शकुंतला ताई वेश्या वस्तीत येणाऱ्या अनेक महिलांसाठी खूप मोठा आधार आणि मार्गदर्शक होत्या. सहेली ला सक्षम कार्यकारी मंडळ तसेच सक्षम आणि नेतृत्व गुण असलेल्या कार्यकर्त्या निर्माण करून त्यांनी खूप मोलाचे कार्य केले आहे. वेश्या व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींच्या हक्कासाठी आणि त्यांच्या गुन्हेगारीमुक्त जीवनाच्या अधिकारासाठी दिलेला शकुंतला ताईंचा लढा हा आज सहेली संघासाठी एक वारसा आहे. १४ ऑगस्ट २०२० रोजी कोविंड-१९ संसर्गामुळे त्या या जगातून कायमच्या निघून गेल्या आहेत. त्यांच्या जाण्याने कधीही न भरून येणारी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांनी सहेली ची केलेली जडण-घडण आणि प्रस्थापित केलेले एक स्थान ही शिदोरी बरोबर घेऊन आमचा प्रवास सुरू आहे. बुधवार पेठेत आणि वेश्या व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींसाठी आपले पूर्ण जीवन व्यतीत केलेल्या शकुंतला ताईंना हे पुस्तक समर्पित करत आहोत.




## आभार

या पुस्तिका निर्मितीसाठी मुलाखत देऊन महत्त्वाची भूमिका बजावली त्या महिला आणि तृतीयपंथी सेक्स वर्कर्स यांचे आम्ही मनापासून आभार मानतो त्याच बरोबर बुधवार पेठेचा समग्र इतिहास आणि घडलेल्या महत्त्वाच्या घडामोडी याबद्दल ज्यांनी सखोल माहिती दिली त्या,बी पन्ना, प्रभाकर मोगल, शांतीलाल सुरतवाला, डॉ वसंत घीया, किसन मुळे, भानुप्रताप बर्गे आणि प्रकाश यादव या सर्वांचे आम्ही आभार मानत आहोत.


## प्रस्तावना

महाराष्ट्रात पुणे येथील बुधवार पेठ ही वर्षानुवर्षे वेश्या वस्ती किंवा लाल बत्ती रेड लाईट एरिया म्हणून ओळखली जाते. ही वस्ती पेशवेकालीन आहे याचे दाखले आणि नोंदी सापडतात. पेशवे काळापासून आतापर्यंत या वस्तीचे स्वरूप खूपच बदलत गेलेले आहे वस्ती आणि त्यात वास्तव्यास असणारी कुटुंबे तसेच वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिला यांच्या परिस्थितीत आणि काम करण्याच्या स्वरूपामध्ये ही खूप बदल झालेले आहेत. साधारण पणे १९९० पासून या वस्ती मध्ये एच आय व्ही एड्स प्रतिबंध आणि नियंत्रण प्रकल्प, स्वयंसेवी संस्थांमार्फत राबवण्यास सुरुवात झाली तेव्हा एक नवीन ओळख या वस्तीची लोकांना होऊ लागली. एच आय व्ही एड्स नियंत्रण प्रकल्प प्रभावीपणे राबवण्याची एक जागा एक समाज इथपासून वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलांची एक मात्र संघटना सहेली संघ या संस्थेची स्थापना आणि अनेक स्थित्यंतरे या काळात घडली. १९९० चा एचआयव्ही एड्स प्रतिबंध आणि नियंत्रण कार्यक्रमाचा काळ ते २०२० कोवीड चा प्रादुर्भाव आणि पर्यायाने टाळेबंदी चा काळ, या कालावधी मधील सर्व बदलांची एक ओळख या पुस्तकाद्वारे समाजापुढे आणण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत. मौखिक इतिहास मुलाखत या पद्धतीने घेतलेल्या काही मुलाखतींचे सार या पुस्तकात सामावलेले आहे. गेल्या पंचवीस ते तीस वर्षांच्या कालावधीत वेश्याव्यवसाय करणाऱ्या व्यक्तींचे बदललेले जीवनमान आणि त्या अनुषंगाने बदललेली परिस्थिती आणि निगडित असलेली व्यवस्था याचे चित्रण या पुस्तकात केले आहे. बुधवार पेठ आणि वेश्या व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींच्या जीवनाबद्दल आणि बुधवार पेठे बाबत जाणून घेण्यासाठी हे पुस्तक एक चांगला संदर्भ असू शकेल याची आम्हाला खात्री वाटते.

**तेजस्वी सेवेकरी**
सहेली संघ, बुधवार पेठ, पुणे



## प्रकल्पाविषयी मनोगत

काळाच्या पडद्यावर लोकांचा अस्सल इतिहास उतरवण्यासाठी आत्तापर्यंत दबलेला आवाज ऐकणे महत्त्वाचे आहे. आपला वैविध्यपूर्ण भूतकाळ आत्मसात करून आपले भविष्य सृजनशील बनवण्यासाठी सेक्स वर्कर्स/वेश्याव्यवसायातील व्यक्ती यासारख्या उपेक्षित लोकांचे मौखिक व्याख्यान हे इतिहासाचे समृद्ध स्त्रोत आहेत. समाजाच्या मुख्य प्रवाहाच्या इतिहासात अदृश्य आणि आवाज नसलेल्या लोकांचे जीवन ,धारणा आणि अनुभव प्रमाणित करणारा हा बुधवार पेठेचा मौखिक इतिहास कार्याच्या व्यापकते मध्ये मौल्यवान भर घालणारा आहे.

**लक्ष्मी मूर्ती**
वरिष्ठ पत्रकार आणि संशोधन मार्गदर्शक



# अनुक्रमणिका


- अर्पणपत्र
- आभार
- प्रस्तावना
- प्रकल्पाविषयी मनोगत

१ मध्यवर्ती पुण्यातले नजरेआड विश्व

२ इतिहासाच्या पानांतून

३ अशी आहे बुधवार पेठ

४ प्रत्यक्ष जगणं

५ त्यांचं जीवन, त्यांची नाती

६ आर्थिक गणितं

७ सहजीवन

८ नागरिक म्हणून ओळख

९ इतर धंद्यातील बदल


१० राजकारणी कभी पास अभी दूर

११ बदलत्या बाह्यरुपाच्या अंतरंगात

१२ पोलीस

१३ संघटन आणि संस्थांची भूमिका

१४ एचआयव्ही ते कोविड-१९: लढाई निकराची



# मध्यवर्ती पुण्यातले
# नजरेआड विश्व

बुधवार पेठ म्हणजे पुण्याचा मध्यवर्ती भाग. मुख्य बाजारपेठ आणि लक्ष्मी रोड या महत्त्वाच्या रस्त्यांची सुरुवात इथेच होते. सराफ बाजार, कापड बाजार आणि धान्याचा घाऊक बाजार या ठिकाणी आहे. बेलबाग, तुळशी बाग, तांबडी जोगेश्वरी ही पेशवेकालीन मंदिरं, पंढरपूरच्या वारीचा महत्त्वाचा थांबा असलेलं पासोड्या विठोबा आणि आधुनिक काळातील दत्त मंदिर, दगडूशेठ हलवाई गणपती ही प्रसिद्ध दैवतं आणि भाऊ रंगारी, गुरुजी तालीम, तांबडी जोगेश्वरी आणि तुळशी बाग हे पुण्याच्या पहिल्या पाच मानाच्या गणपतींपैकी ( गणपती विसर्जन मिरवणुकीत या पाच गणपती सर्वात पुढे असतात ते सर्वात जुने सार्वजनिक गणपती आहेत) चार इथेच आहेत.

पुण्याला पूर्वेचे ऑक्सफर्ड म्हटलं जातं. त्याचा मुख्य पुस्तक बाजार असलेला आप्पा बळवंत चौक आणि इलेक्ट्रिक दिव्यांची बाजारपेठ असलेली तपकीर गल्ली इथेच आहे. महात्मा जोतिबा आणि सावित्रीबाई फुले यांनी सुरू केलेल्या पहिलीच्या मुलींची शाळा भरविली तो भिडेवाडा इथेच आहे.

या सर्वांच्या पलीकडे असलेली बुधवार पेठेची ख्याती राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर पसरली आहे, ती बुधवार पेठ आहे इथली लाल बत्ती वस्ती म्हणजेच वेश्या व्यवसाय. आज जगातल्या प्रत्येक ठिकाणाची इत्यंभूत माहिती देणाऱ्या गुगलवर 'बुधवार पेठ' असं टाईप केल्यावर काय दिसतं? तर या बुधवार पेठेचे चोरून, लपवून काढलेले व्हिडिओ आणि फोटो. तीच तीच त्रोटक माहिती वेगवेगळ्या रूपात, भाषेत, निरनिराळ्या वेष्टनात दिलेली आढळते. अनेक लोकांना बुधवार पेठ, इथल्या लैंगिक सेवा, त्यांचे दर, इथे आलेल्या लोकांचे अनुभव जाणून घेण्यात रस आहे असं दिसतं. बहुतांश माहिती ही वस्ती आणि इथल्या स्त्रियांबद्दल नकारात्मक मत तयार करणारी आहे.





कोलकत्ता, मुंबईनंतर ही भारतातली तिसऱ्या क्रमांकाची लाल बत्ती वस्ती आहे. गेल्या काही वर्षांत विशेषत: एच.आय.व्ही. प्रतिबंध आणि त्यासंबंधी संस्थांचे उपक्रम किंवा अल्पवयीन मुलींच्या सुटकेसाठी पोलिसांनी इथे टाकलेल्या धाडी याबाबतच्या बातम्यांतून बुधवार पेठ प्रामुख्याने झळकताना दिसते. २००८ मध्ये जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती मायक्रोसॉफ्टचे सर्वेसर्वा बिल गेटस् यांनी इथल्या लाल बत्ती वस्तीतल्या स्त्रियांना प्रत्यक्ष भेट दिली. (बिल ॲन्ड मिलिन्डा गेट्स फाउंडेशनने भारतात एच आय व्ही प्रतिबंधासाठी 'आवाहन' प्रकल्पाला निधी दिला होता. त्याअंतर्गत बुधवार पेठेत सेक्स वर्कर्स संघटना काम करत होत्या. ही इथली आजवरची सगळ्यात मोठी बातमी आहे; पण त्यापलीकडेही इथल्या बायका, त्यांचं जीवन याबद्दल फारशी माहिती मिळत नाही.

वेगवेगळ्या उद्देशाने तयार करण्यात आलेले दस्तावेज आणि इथे राहणाऱ्या, काम करणाऱ्या लोकांच्या नजरेतून, आठवणींतून जमा केलेले तुकडे जोडून बुधवार पेठेचं हे 'जिगसाँ पझल' पूर्ण साकारावं आणि गेल्या पन्नास वर्षांतील बुधवार पेठेचा इतिहास मांडावा, या उद्देशाने हा पुस्तक प्रकल्प हाती घेतला होता. त्यानुसार काम सुरू असतानाच 'कोविड 19' ही अनपेक्षित आपत्ती समोर उभा ठाकली अन् आणखी प्रत्यक्ष भेटी आणि मुलाखती घेणे शक्य नाही, हे ओळखून आतापर्यंत जमवलेल्या माहितीचे तुकडे जोडून हे पुस्तिका पूर्ण करावी असं ठरलं.

कोवीडमुळे लागू केलेली टाळेबंदी आणि संचार निर्बंध यामुळे प्रत्यक्ष शरीरसंबंधावर अवलंबून असलेल्या इथल्या उपेक्षित समाजाच्या अस्तित्वासमोर मोठं प्रश्नचिन्ह निर्माण झालंय. यापूर्वी एच.आय.व्ही.ने या समाजाचा मृत्युलेख लिहिण्याचा प्रयत्न केला होता. त्या दुर्धर प्रसंगावर त्यांनी धीराने आणि एकजुटीने मात केली. स्वत:लाच नाही तर संपूर्ण समाजालाच या लागणीपासून वाचविण्याचं मोठं काम केलं. कोविडचा सामना करण्यासाठीही बुधवार पेठ प्रयत्नशील आहे.

बुधवार पेठ आणि इथल्या लाल बत्ती वस्तीला सुमारे ४०० वर्षांचा इतिहास आहे. मात्र, पेशव्यांपासून ते स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळातील काही त्रोटक दस्तावेजात ही वस्ती आणि वेश्या व्यवसायाचा ओझरता उल्लेख आहे. त्याचा धागा पकडून वर्तमानातल्या बातम्या आणि इथल्या रहिवाशांचं प्रतिनिधित्व करणाऱ्या काही लोकांच्या आठवणींवर आधारित बुधवार पेठेची रंगबिरंगी गोंधडी शिवण्याचा हा प्रयत्न आहे.



# इतिहासाच्या पानांतून

पेशवे पुण्यात आल्यानंतर त्यांनी पेठा वसविल्या. देवळं बांधली. हौद बांधले. कारंजी बांधली. फळबागा लावल्या तसेच वाडे बांधले. 'पेशव्यांचं विलासी जीवन' या पुस्तकात सवाई माधवराव पेशव्यांचे निजामाच्या दरबारातील वकील गोविंदराव काळे यांनी चंद्री या कलावंतीणीला १००० रुपये मासिक पगारावर पुण्याला पाठविले होते, असं म्हटलं आहे. पुढे दुसरे बाजीराव यांच्या अमदनीत चंद्री आणि सुगुणी या दोन कलावंतिणींसाठी पुण्याच्या शुक्रवार पेठेत वाडे बांधल्याचा उल्लेख आहे. १८व्या शतकात पेशव्यांनी 'बावनखणी'(म्हणजे बावन्न खणांचे/खोल्यांचे घर) वसविली. त्यांच्या तैनातीत असलेल्या सैन्याला शरीरसुख देणाऱ्यांची ही वस्ती. बुधवार पेठेतला 'रेड लाईट एरिया' हा या ऐतिहासिक बावनखणीच्या जवळपासच वसलेला आहे. 'गॅझेट ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, १९८५'मध्ये हे संदर्भ आहेत.

त्याकाळी मुस्लिम आणि हिंदू पुरुषही एकाहून अधिक विवाह करू शकत असले, तरीही ज्या स्त्रियांचं सौंदर्य किंवा कलागुण आवडतील, त्या स्त्रियांना नाट्य शाळा म्हणून ठेवण्याची पद्धत होती. त्यांच्या मासिक खर्चासाठी पैसे दिल्याचा हिशेब लिहिलेला आहे. या नाट्य शाळांना पत्नीप्रमाणे ठेवले जात असले, तरी पत्नीचा दर्जा दिला जात नसे, तसेच घरातील इतर वेगवेगळ्या कामांसाठी ठेवलेल्या स्त्रियांना कुणबीण म्हटलं जात असे. त्यांची रीतसर खरेदी-विक्री होत असे किंवा त्या नजराणा म्हणूनही पाठविल्या जात.  या स्त्रिया त्यांच्या मालक- मालकिणीच्या गुलाम असायच्या. त्यांना त्यांच्या मुलांसह विकत घेतलं जात असे. क्वचित डोक्यावर तेल लावून अथवा त्यांच्या खांद्यावरून पाणी भरलेले मडके फोडून त्यांची मुक्तता केली जात असे. या स्त्रियांना लग्न करण्यास मनाई होती. अनेकदा या स्त्रिया पळून गेल्याची उदाहरणं आहेत.





साधारण खालच्या जातीतील आणि गरीब घरातील स्त्रिया कुणबिणी होत असत, तर काही चांगल्या घरातील स्त्रियांना फसवून विकलं जाणं किंवा बदकर्म करणाऱ्या ब्राह्मण स्त्रिया, केस वाढविणाऱ्या, शृंगार करणाऱ्या ब्राह्मण विधवा स्त्रियांनाही कुणबीण होण्याची शिक्षा दिली जाई.

रावबाजीचे शहर नमुना पुणे ग्राम वस्ती

अहोरात्र, अहोदिवस होती इष्काची कुस्ती' असं सगनभाऊ यांनी पेशवाईतील पुण्याबद्दल लिहिलं आहे.  त्याकाळच्या नामवंत कलावंतीणींना पेशव्यांनी भरभक्कम बिदागी दिल्याची नोंद आहे. गणेशोत्सवाच्या काळात गोसावी हरदास यांना २,१५५ तर कलावंतिणीच्या ताफ्याला १,७२६ रुपये बिदागी देण्यात आली अशी नोंद असलेला फलक विश्रामबाग वाड्यातील संग्रहालयात लावलेला आहे. दुसर्या बाजीरावाच्या काळात वेंकट पारसी आणि धर्मी पारी या दोन नर्तकींची नेमणूक करण्यात आली. १८०२ मध्ये वेंकट पारसी हिला सतत तीन रात्री नृत्य केल्याबद्दल २६,००० रुपये बक्षीस दिल्याची नोंद आहे. मालक मेल्यावर आणि पेशवाई अस्तंगत झाल्यावर या कलावंतीण आणि कुणबिणींचं काय झालं, याची नोंद कुठेच आढळत नाही. इंग्रज सरकारने मराठ्यांकडे १५ हजार गुलाम होते, असं नमूद केलेलं आहे. त्यांपैकी काही कुणबिणींना, कलावंतिणींना विकत घेण्यात आले आणि त्यांना पुढे नाचाचं शिक्षण देण्यात आलं.

आजच्या बुधवार पेठतील शनी मंदिराजवळ ही बावनखणी होती, असं जुने स्थानिक सांगतात. पेशवाईत शनिवारवाड्यात सैन्य वस्तीला असल्याने त्यांच्या करमणुकीसाठी ही सोय केली, असं म्हणणं आहे. शनिवारवाड्याला लागूनच असलेल्या शालूकर बोळात काही घरांमध्ये आजही हा धंदा चालतो. पेशवाई गेल्यानंतर सैन्य गेलं; पण या बायका आणि धंदा इथेच राहिला.  नाच-गाण्याची

परंपरा पुढे कायम राहिली नाही. तबला गल्लीच्या सुरुवातीला असलेल्या एक-दोन घरांमध्ये नाचगाणं चालायचं, असं जुन्या बायकांना आठवतं.

लष्कराला यायला प्रतिबंध म्हणून याचं नाव 'रेड लाईट एरिया'केल्याचं डॉ. वसंत घिया यांनी सांगितलं. 'विधवा आणि एकट्या स्त्रिया डेटिंगसाठी उपलब्ध आहेत, असा संदेश देण्यासाठी घराबाहेर लाल कंदील ठेवण्याची ॲमस्टरडॅममध्ये प्रथा होती. त्यावरून वेश्या व्यवसाय चालणार्या वस्तीला हे नाव पडलं, असं म्हटलं जातं. "बुधवार पेठेच्या चौकात पूर्वी 'इसके आगे आर्मी के लोग न आये' असा बोर्ड लिहिलेला होता. इथे येणं हा भारतीय लष्करातील जवानांसाठी गुन्हा होता. लष्करासाठी वेगळी सोय केलेली होती. तिथे स्वेच्छेने आलेल्या स्त्रिया होत्या. त्यांची आरोग्य तपासणी व्हायची. हे अधिकृतपणे ते करीत होते, आता अधिकृतपणे हा धंदा करता येत नाही." असं डॉ. घिया म्हणाले.

१९८० साली बुधवार पेठेजवळच्या महात्मा फुले मंडईतील घाऊक व्यापार गुलटेकडी इथे हलवला जात होता, तेव्हा हा व्यवसायही गुलटेकडी मार्केट यार्ड परिसरालगत स्थलांतरित करण्याचा प्रस्ताव होता. तो इथल्या कुणालाच मान्य नव्हता. एस. के. कुसाळकर या काँग्रेसच्या पुढार्याने सेक्स वर्कर महिलांचा प्रस्ताव पुढे नेला. इंदिरा गांधींनी त्यावेळी बुधवार पेठेच्या शिष्टमंडळाला भेट दिली, त्यामुळे स्थलांतर रोखलं गेलं, असा संदर्भ प्रकाश यादव व पुण्याच्या माजी पोलीस आयुक्त मीरा बोरवणकर यांनी तयार केलेल्या बुधवार पेठेच्या अहवालात सापडतो.



# अशी आहे बुधवार पेठ

शालूकर बोळ आणि त्याला जोडणाऱ्या इतर गल्ल्या म्हणजे दाणे आळी, चोळखण आळी, ढमढेरे बोळ, तबला गल्ली आणि नव्याने वसलेल्या बाटा गल्ली, मेडिकल गल्ली ही बुधवार पेठेतील प्रामुख्याने धंद्याची ठिकाणे आहेत. यातला काही भाग शुक्रवार पेठेतही येतो. चार मुख्य गल्ल्या आणि त्याला जोडलेल्या ११ गल्ल्यांमधल्या ३६५ कुंटणखान्यातून अंदाजे ५,००० सेक्स वर्कर्स काम करतात, अशी नोंद २००८ मध्ये करण्यात आली आहे.

धंद्याची गल्लीनुसार विभागणी झालेली आहे. मरगी गल्लीत सध्या नेपाळी महिलांची संख्या जास्त आहे. एप्रिल २०१५ च्या नेपाळच्या भूकंपानंतर अगोदरच्या संख्येत १००-१५० जणींची भर पडली. बाटा गल्लीत आंध्र प्रदेश व कर्नाटकातील महिला, तर ढमढेरे बोळात तृतियपंथी. त्यापैकी मरगी गल्लीत सर्वांत जास्त ९२ कुंटणखाने असून, तिथे सुमारे २,००० महिला सेक्स वर्क करतात. बाटा दुकानाजवळच्या चिंचोळ्या गल्लीत सहा इमारतींमध्ये १५२ सेक्स वर्कर्स राहतात. ढमढेरे बोळात ४१ कुंटणखाण्यात ४०० सेक्स वर्कर्स राहतात, त्यापैकी १७ मध्ये तृतियपंथी राहतात. बाहेरून महिला येऊन इथे लैंगिक संबंधापुरती जागा भाड्याने घेऊनही धंदा करतात. इथे काही घरवाले पुरुष आहेत. मात्र, पुरुष सेक्स वर्कर इथे कधीच नव्हते.





१९७० च्या अगोदर खूप देवदासी महिला कर्नाटकातून इथे धंद्यासाठी यायच्या. दुष्काळ, पाण्याची टंचाई, काम नाही, अशा परिस्थितीमुळे त्यांच्या मूळ गावी त्यांना देवीला सोडायचे. मूळ प्रश्न आर्थिक होता. जर पाणी आलं, शेती फुलली, तर परिस्थिती बदलली असती. त्यांचे मतपरिवर्तन करायचा मी खूप प्रयत्न केला," असं या विभागाचे माजी नगरसेवक शांतिलाल सुरतवाला यांनी सांगितले. ते तीनवेळा इथून निवडून आले होते. "कर्नाटकातून आलेल्या देवदासी महिला पळून जाण्याची शक्यता नसते. कारण, त्यांचे आई-वडीलच त्यांना इकडे सोडून जातात" असं डॉ. घिया यांचं निरीक्षण आहे.

१९९५-९६ मध्ये बुधवार पेठेत ४० टक्के कानडी स्त्रिया होत्या, त्यांच्यापैकी ८०-८५ टक्के महिला देवदासी होत्या. कर्नाटकमध्ये देवदासींसाठी अनेक योजना आणल्यामुळे त्यातील खूपजणी तिकडे परत गेल्या. दाणे आळीत आंध्र प्रदेशातील तेलुगु महिला जास्त होत्या. आंध्रमधल्या देवदासी कमी होत्या. त्याचे प्रमाण २० टक्के होते. नेपाळी स्त्रिया दत्त मंदिराजवळच्या ठरावीक घरात होत्या. ढमढेरे गल्लीत नेहमी तृतीयपंथी राहात होते, तसेच त्यांच्याबरोबर काही वयस्क स्त्रिया राहतात. काही तरुण महिला तिथे राहात असल्या, तरी धंद्यासाठी त्या मरगी गल्लीत येतात. २००३ पर्यंत १५०-२०० तृतीयपंथी तिथे राहात होते. आता तेथे केवळ ४५ तृतीयपंथियांचं वास्तव्य आहे. असं तृतीयपंथीयांच्या 'आशीर्वाद' संघटनेच्या बी पन्ना यांनी सांगितलं.

तेलुगु महिला करारावर काम करायच्या. तीन किंवा पाच वर्षांनंतर त्या महिलांना किती पैसे, कपडे, दागिने देणार हे ठरलेलं असायचं. किती नवीन कपडे म्हणजे कपड्याच्या ट्रंक असा उल्लेख असायचा. एक-दोन ट्रंक असा. त्या कराराला कोणतीही कायदेशीर मान्यता नसली तरी तो करार पाळला जायचा. हा करार महिलांचे नातेवाईक आणि घरवाली यांच्यात व्हायचा. बऱ्याच महिला करार

संपल्यावर घरी परत जायच्या आणि परतही यायच्या. हे पैसे, कपडे, दागिने त्या स्वतःच्या लग्नासाठी हुंडा जमवायच्या. तिकडे तिचे लग्न लावले जायचे; पण पाच-सहा वर्षे धंद्यात काढल्यानंतर तिथे राहणं अवघड होत असावं, म्हणून अनेकजणी परत यायच्या. सरसकट जाऊन येऊन करणाऱ्या देखील होत्या. आंध्र पोलिसांनी खूप मोठ्या प्रमाणावर छापे घातल्यामुळे तिथून बुधवार पेठेत येणाऱ्या महिलांचं प्रमाण कमी झालं. 'सहेली कार्यकर्ता संघ' या सेक्स वर्कर संघटनेच्या सचिव तेजस्वी सेवेकरी यांनी सांगितलं.

महिलांना वस्तीत घेऊन येणाऱ्यांच्या नातेवाईक / दलालांना दिलेल्या मोबदल्याचं कर्ज महिलांना सेक्स वर्क करून फेडावं लागतं. ते फेडण्यासाठी त्यांना साधारण चार वर्षे लागतात. त्यामुळे बऱ्याचदा बुधवार पेठेत आल्यानंतर चार वर्षांनीच महिला घरी जातात. काही महिला दोन वर्षांतही त्यांचं कर्ज फेडतात. तिला ज्या किमतीला विकत घेतलं आहे, ती रक्कम व्याजासह फेडल्यानंतरच त्यांना घरी जाता येतं. महिलांना आपल्या कमाईतला अर्धा हिस्सा घरवालीला द्यावा लागतो, यालाच 'अर्धेलीने धंदा' करणं म्हणतात. ही प्रथा भारतात सगळीकडे प्रचलित आहे. महिलांना आपल्या वाट्याला आलेल्या अर्ध्या कमाईतून जेवण, कपडे, साफसफाई आदी खर्चही भागवावे लागतात. २०१० पासून कलकत्ता आणि बांगलादेशी बंगाली महिला इथे येऊ लागल्या," असं तेजस्वी सेवेकरी यांनी सांगितलं.

शुक्रवार पेठ, दाणे आळी, मरगी गल्ली आदी ठिकाणी त्या आहेत. बंगाली महिलांनी अर्धेलीने काम करण्याचा हा ट्रेंड मोडला आहे. त्या घरवालीकडे राहात नाहीत. एकट्या किंवा नवऱ्याबरोबर खोली भाड्याने घेऊन राहतात. त्या अर्धेलीने धंदा करीत नाहीत म्हणून त्या घरवालीच्या कंट्रोलमध्ये राहात नाहीत. सगळी कमाई त्यांचीच राहते. भाडं भरण्यापासून जो काही खर्च येतो तो त्याच करतात.



बंगाली महिलांना जास्त मागणी आहे. त्यांचे दर कमी आहेत, त्यामुळे त्या जास्त कमाई करतात. त्या खूप गरजू आहेत. त्यांच्या घरी पाच-सहा भावंडं आहेत. या सगळ्या स्वतःहून आलेल्या आहेत. बांगलादेशी महिला आधी कोलकत्त्याला राहून आलेल्या असतात. इथे वर्षानुवर्षे राहणाऱ्या महिला कमी झाल्या आहेत. दहा वर्षांपूर्वी इथे महिलांची संख्या ५,००० होती, ती आता ३,००० इतकी झाली आहे. तेजस्वी सांगतात.

बंगाली महिला घरवालीकडे राहात नसल्या तरी त्यांना या परिसरात काम करणे सुरक्षित आहे म्हणून त्या इथेच राहतात. याच भागात त्यांना कोणत्याही कागदपत्राशिवाय स्वस्तात रहायला घर मिळू शकतं. त्या एका रूमचं १५ दिवसांचं भाडं देतात, हे सोयीचं असल्याने घरवालीही त्यांना भाड्याने घर देते." असं त्या म्हणतात.

सर्व महिला सर्वसाधारणपणे आपापल्या भाषेच्या, राज्यातल्या महिला आणि घरवालीसोबतच राहतात. विशेषत: नेपाळी महिला सहसा इतर भाषेच्या घरवालीसोबत राहताना दिसत नाहीत. काळाप्रमाणे हा ट्रेंड बदलला असून आता कानडी घरात नेपाळी, बंगाली, मराठी महिला दिसतात. बुधवार पेठेत वेगळी मराठी ब्रोथेल्स नाहीत. घरवाल्या जास्त कानडीच आहेत, त्यांच्याकडे मराठी महिला राहतात किंवा धंद्यासाठी शहरातल्या इतर भागातून इथे येतात. हा फरक आहे. खास करून कानडी घरात वेगवेगळ्या भाषेच्या महिला दिसतात. काही थोड्या ठिकाणी बंगाली महिला नेपाळी घरातही दिसून येतात." असं सेवेकरी यांचं निरीक्षण आहे.

नेपाळी महिलांचे कामाचे रेट इतर सर्व स्त्रियांपेक्षा जास्त असतात. कानडी आणि मराठी महिलांचे रेट सरासरी, तर बंगाली महिलांचे कमी असतात. रंग, वय, सेक्स

अपील आणि पैशाची गरज यानुसार प्रत्येक व्यवहार ठरत असतो. आंध्रच्या मुली शक्यतो नियमित येणाऱ्या गिऱ्हाईकांबरोबर धंदा करतात, तसेच बाहेर जायला तयार असतात. बंगाली महिला कुठेही जायला आणि कोणत्याही प्रकारच्या सेक्ससाठी तयार असतात. त्या ॲनल आणि ओरल सेक्स करतात हेही खुलेपणाने सांगतात. इतर महिलाही करतात; पण 'ये गंदा काम हम नही करते' असं म्हणून म्हणून अमान्यही करतात. या 'वेगळ्या' प्रकारच्या सेक्सचे त्यांना जास्त पैसे मिळतात. ओरिसाच्या काही महिला कलकत्त्यावरूनच बुधवार पेठेत येतात. हिंदी प्रदेशातल्या महिला इथे येत नाहीत." असे तेजस्वी सांगतात.

धंदा करणार्या महिलांना इतरत्र कुठे जागा मिळालीच नसती, त्यामुळे त्यांचा परिसर सीमित राहिला. बाहेर धंदा वाढला असला, तरी तो गुप्तपणे चालतो, हा मात्र खुला आहे. त्यांना संरक्षण हवं. महिलेने एकटीने धंदा केला, तर असुरक्षित आहे, तिचा जीव घेतला जाऊ शकतो किंवा तिला पळवून नेण्याची शक्यता असते, म्हणून त्या संघटित होऊन इथेच राहिल्या. साहजिकच त्यामुळे एकमेकींना आधार झाला." हे स्थानिक रहिवासी, व्यापारी आणि इमारतींचे मालक प्रभाकर मोगल यांचे निरीक्षण आहे.

आज बदललेल्या रूपात बुधवार पेठ उभी आहे. 'वेलकम', 'चांदनी', 'सपना' आदी हिंदी चित्रपटांच्या नावाच्या इमारती इथे आहेत. काही नवख्या गिर्हाईकांची नुसतीच पाहणी किंवा उत्सुकतेने चालू असलेली ये- जा आणि सराईत गिर्हाईकांच्या वर्दळीने हा भाग कमी-अधिक प्रमाणात सतत गजबजलेला असतो.




# प्रत्यक्ष जगणं

१९७०-८० च्या दशकात प्रामुख्याने बिहार, आसाम, पश्चिम बंगाल या राज्यांतून, तसेच नेपाळ व बांगलादेशातून महिला येऊ लागल्या. त्यावेळी बुधवार पेठ हा संमिश्र वस्तीचा 'रेड लाईट एरिया' बनला.

## नेपाळी महिला

मी ८३ मध्ये प्रथमच पुण्यात आले, त्यावेळी इथे नेपाळी महिला कमी होत्या, त्यामुळे मी कन्नड घरवालीकडे राहिले. मुंबईहून पळून आले होते. ४-५ दिवस मी तेच कपडे घालत होते. शेवटी इंदिरा सेलमधून तेव्हा २-३ रुपयांत साडी विकत घेतली. तीन-चार महिने माझा धंदाच झाला नाही. मग मी दुसऱ्यांची धुणीभांडी केली. नंतर एक-दोन गिऱ्हाईक आले आणि हळूहळू माझा धंदा वाढला.

मला मुंबईत ३५ हजारांत खरेदी केलं होतं. सहा महिने मी मुंबईमधल्या महिला आश्रमात (आधारगृह) राहिले होते. मला घरी जायचं आहे, असं मी सांगितलं होतं; पण घरवालीकडून काही पैसे घेतले असतील, त्यामुळे मी पुन्हा धंदा करू लागले.



आम्ही जिथे राहात होतो, तिथेच कपडे विकायला व्यापारी यायचे. महिन्याच्या महिन्याला त्याचे पैसे द्यायचो. तेव्हा मी २०-२२ वर्षांची होते, खोटे कशाला बोलू. चांगली कमाई व्हायची. तेव्हा स्वस्ताई होती. कपडेवाल्याला महिन्याला ६०-७० रुपये द्यायचे. कधी कधी त्याला रोज पाच रुपयेही द्यायचे. तो व्यापारी एक डायरी द्यायचा. त्याच्यावर रोज हिशेब लिहायचा. मेकअपचं सामान रोखीने खरेदी करीत होतो.

त्यावेळी नेपाळी घरं कमी होती. खूप जुन्या घरवाल्या होत्या, त्यावेळी कन्नड आणि तेलुगु महिला जास्त होत्या. नेपाळी महिलांची तीन घरं होती. एक 'न्यू वेलकम'मध्ये होतं, दुसरं दाणे आळीत आणि तिसरं शुक्रवार पेठेत होतं. सगळ्या मिळून ३०-४० नेपाळी महिला होत्या. नेपाळी घरात नेपाळी महिलाच असायच्या. तिथे दोनवेळचं जेवण घरवालीच द्यायची. जेवणात डाळ, भात आणि भाजी असायची. तेव्हा एका वेळचा रेट १२ ते २२ रुपये होता. मुलगी सुंदर असेल, तर ६०-७० रुपये रेट होता. एका गिर्हाईकामागे ११ रुपये घरवालीचे आणि ११ आमचे. बाकीचा सगळा खर्च आमच्या पैशाने करावा लागायचा.

मी १७ वर्षे धंदा केला. आता तेलुगु आणि कन्नड महिला कमी झाल्या. फक्त बंगाली राहिल्या आहेत. बऱ्याचजणी बुधवार पेठेतून बाहेर पडल्या. त्यांनी बालाजीनगरमध्ये खोल्या घेतल्या आहेत.

महिलांची संख्या वाढत चालली, तशा चोऱ्यामाऱ्याही वाढल्या. अगोदर महिलांना विकत घेतल्यावर कुठे जाऊ दिलं जात नव्हतं. एक बाई दरवाजावर पहारा द्यायची. त्या महिलेला सर्व कर्ज फेडावं लागायचं. गिऱ्हाईकाने दिलेले पैसे जमा करून महिना अखेरीला हिशेब व्हायचा. तेव्हा मी महिन्याला दहा-वीस हजार कमवायचे. त्यातले अर्धे घरवालीला जायचे.

## स्थानिक मराठी महिला

मालकिणी नवीन महिलांना आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी त्यांच्यावरचे कर्ज वाढवत न्यायच्या. त्यांनी कितीही कमावलं तरी महिलांच्या हातात कमी पैसे पडायचे. खर्च फार व्हायचा. आम्ही नवे कपडे घेतले की, मालकिणीलापण घ्यावे लागायचे.

मी बुधवार पेठेत खूप घरं बदलली. सुरुवातीला सुशीलाबाईकडे, नंतर सोनाबाई, तुळसाबाईकडे, त्यानंतर पदाव्वा, रेणुका आणि जयाकडे राहिले. जिथं जमत नाही असं वाटतंय, तिथून बाहेर पडायचं. गिऱ्हाईकाने जास्त पैसे दिल्यावर तेपण मालकिणीला द्यावे लागायचे. त्यावरून भांडणं व्हायची. मी जवळपास १०-१२ घरं बदलली. नंतर मी मालकासोबत खोली करून राहू लागले. आता यातल्या कोणीही घरवाल्या राहिल्या नाहीत. फक्त शुक्रवार चौकीच्या बाजूचं घर आणि शांताबाईचं घर बदललं आहे. बाकी घरं आहे तशीच आहेत. आता जुनी झाली आहेत.

## बंगाली महिला

मी बुधवार पेठेत आले तेव्हा 'कभी खुशी कभी गम' चित्रपट आला होता (१९९९). १७ वर्षांची होते मी तेव्हा. मी 'दिल है तुम्हारा'सुद्धा (२००२) पाहिला. त्याकाळात नेपाळी महिला आम्हाला खूप मारायच्या. चांगलं जेवणही द्यायच्या नाहीत. बाहेर जाऊ द्यायच्या नाहीत. तीन वर्षांनंतर ३-४ लाख रुपये आणि सोनं देतो, असं म्हणून त्या भुलवत ठेवायच्या. पहिलं गिऱ्हाईक आणलं, तेव्हा कंडोम कसा लावायचा ते मला माहीत नव्हतं. घरवालीकडे मॅनेजरचा मुलगा होता. वयस्कर होता तो. तोच प्रत्येक मुलीचं सील तोडायचा (तिच्याबरोबर पहिला संभोग करायचा.) तो मुंबईवरून पुण्याला येऊन-जाऊन रहायचा. मला हे काम करायचं नाही असं




म्हटलं की, घरवालीच्या घरचे लोक मारहाण करायचे. आंटीनेच मला कंडोम लावायला शिकवलं. मी बुधवार पेठेत होते हे समजलं तर घरात कोण घेणार? जड मनाने मी धंदा करायला सुरुवात केली. नेपाळी महिलांनी ना मला माझी कमाई दिली ना सोनं. जे काय ५०-१०० रुपये बक्षीस मिळायचे, ते तेवढे असायचे माझ्याकडे. तिथे मिळालेले वीस हजार रुपये घेऊन मी दुसरीकडे गेले आणि सोलापूरला का कुठे जाऊन उडवून आले. तेव्हाचा काळ चांगला होता. तेव्हा १०० रुपये रेट होता; पण महागाई कमी होती. आता महागाई वाढली आहे.

सगळे कमावलेले पैसे मी घरवालीला देत होते. आजारी पडले तर कुणाबरोबर तरी दवाखान्यात पाठवायची किंवा घिया डॉक्टरला घरी बोलवायची. आठ वर्षे काम केल्यानंतर मी बाहेर पडले. तेही तू मला सोडलं नाहीस तर जबरदस्तीने ठेवल्याबद्दल खटला ठोकीन अशी धमकी दिल्यावर तिनं सोडलं. मी घरवालीला विचारायचे, असा धंदा करून दुसऱ्याचं जीवन का बरबाद करतेस? कोणीच अशा महिलेला घरी परत घेणार नाही असं बोललं की सगळे मला मारायचे. तेव्हा ती म्हणायची, 'मीपण असा धंदा करूनच घरवाली झाले. घर घेतलं.' मी धंदा करणार नाही म्हटल्यावर घरवाली मला मारायची. काय करणार त्या दबावामुळे मला धंदा करायला लागायचा.

मी पहिल्यांदा जुन्या 'वेलकम'च्या पाचव्या मजल्यावर आले. आठ वर्षांनंतर तिथून निघून गेले. आमच्यासारख्या महिलांना विकून दलाल पैसे घेऊन निघून जातो. आम्ही मात्र काम करून दोन लाख रुपये फेडत रहायचे. आठ वर्षे काम करून मी घरवालीचे पैसे चुकते केले. फक्त जेवण आणि औषधपाणी मिळायचं. कपडे, बाहेरचं खाणं स्वतःच्या पैशाने मागवायचं. चहावाला, हॉटेलवाला सगळे घरी यायचे. काही गरज असेल तर मॅनेजरला सांगायचं. कधी ५००, तर कधी १००० रुपये धंदा होतो. आता त्यापेक्षा जास्त धंदा होत नाही. स्वतःबरोबरच पोरांच्या

पोटापाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. भाडं, पाणीबिल, गॅस असं सगळं मिळून महिन्याला पंधराशे ते दोन हजार रुपये खर्च होतात. मिळकत कमी अन् खर्च जास्त अशा परिस्थितीत आम्ही काय करायचं?

आता बिल्डिंग तर खूपच आहेत; पण जास्तीत जास्त महिला बाहेरच राहतात. सध्या बुधवार पेठेत नवरे आणि मुलंवाल्या महिला जास्त आहेत. पूर्वी घरीच शॉपिंग करायचो. आता आम्ही पिंपरी, कॅम्पमध्ये, मॉलमध्ये जातो. हडपसर, तुळशीबागेतही जातो.





बुधवार पेठेत काहीच चांगलं नाही. गिऱ्हाईक मिळत नाही. दोस्ती सगळ्यांबरोबर आहे; पण दोस्त कोणी नाही. बुधवार पेठ आवडत नाही. काय करायचं, मुलांचं भविष्य घडवायचंय, रहायला घर घ्यायचंय. गेल्या काही वर्षांत मोबाईलमुळे तरुण महिलांना दलालाची गरज कमी भासते; पण मध्यमवयीन आणि वयाने जास्त असलेल्या महिलांना दलालाची गरज असते. बऱ्याचदा रिक्षावालेच हे काम करतात. असं तेजस्वी सेवेकरींचं असं निरीक्षण आहे.

बऱ्याचजणी अप्पर इंदिरानगर, शनिनगर, कात्रज इथे स्थलांतरित झाल्या आहेत. आता कोविड मदतकार्याच्या वेळी आम्ही त्यांना भेटलो. या महिलांकडे कागदपत्रं नसल्यामुळे त्या कात्रजच्या अगदी आतल्या बाजूला आठजणी आठ हजार रुपये भाडं देऊन एका खोलीत राहतात. कागदपत्रं नसल्याने त्यांच्याकडून वाटेल तेवढं भाडं मागितलं जातं. बुधवार पेठेत त्याच खोलीचं भाडं अडीच-तीन हजार आहे. मरगी गल्ली, दाणे आळीच्या नवीन बिल्डिंगमध्ये भाडं जास्त आहे; पण कामाचं ठिकाण इथेच असल्याने परवडतं. लांब राहणार्या महिलांना प्रवासाचे वेगळे पैसे मोजावे लागतात; पण पोलिसांचा ससेमिरा चुकविण्यासाठी त्या लांब राहणं पसंत करतात." असं त्या म्हणाल्या.

## • तृतीयपंथी

बुधवार पेठेत महिला आणि तृतीयपंथी सेक्स वर्कर्स आहेत. पुरुष सेक्स वर्कर्स मात्र इथे कधीही नव्हते. इंदिरा गांधींचा मृत्यू झाला त्याच्या आधी ४-५ वर्षे मी आंध्र प्रदेशातून बुधवार पेठेत आले. माझी सलमा गुरूंची ओळख झाली. त्या इथे रहायच्या म्हणून मी इथे आले. त्या मला सांगायच्या की, आम्ही क्लायंटकडून दोन रुपये घेऊन धंदा केला आहे. १९८० च्याही आधीची गोष्ट आहे ही.

इथे येऊन धंदा करायचा की मंगती करायची, हे तू ठरवायचं असं मला माझ्या गुरूंनी सांगितलं होतं. मीही माझ्या चेल्यांना त्यांना हवं ते करण्याचं स्वातंत्र्य देते. मी स्वत: फिल्ममध्ये काम करते. एक चेला नोकरी करते, एक पार्लर चालवते. आता वेगवेगळे पर्याय उपलब्ध आहेत. मागून खाणं हीच आमची परंपरा आहे. शेकडो वर्षे हे चालत आलं आहे; पण आज कितीतरी तृतीयपंथी शिकलेले आहेत. ॲक्टिंग, फॅशन डिझायनिंग अशा वेगवेगळ्या क्षेत्रात त्या नोकरी आणि व्यवसाय करत आहेत.

बुधवार पेठेतली परिस्थिती आता खूप बदलली आहे. इथे पूर्वी ५०० च्यावर तृतीयपंथी होते. आता जेमतेम ४०-५० आहेत. काहीजण सोडून गेले. काही हे जग सोडून निघून गेले. काही पार्टनरसोबत गेले. पूर्वी आम्हा हिजड्यांकडे सर्वजण आदराने बघायचे. आता तसं नाही. धंदाही कमी झालाय. लैंगिक संबंधांमध्ये प्रत्येकाची आवड असते. काही पुरुषांना पुरुष आवडतात, तर काहींना तृतीयपंथी. विवाहित पुरुषसुद्धा येतात आमच्याकडे. त्यांची पत्नी गरोदर असेल किंवा तिची पाळी झाली की ते आमच्याकडे येतात. आम्ही त्यांची गरज भागवितो; पण म्हणून कोणी आमची दखल घेतं असं नाही.

प्रत्येक गिऱ्हाईकाची आपापली आवड असते, त्यामुळे महिला सेक्स वर्कर आणि तृतीयपंथी यांची आपसात स्पर्धा नसते. आम्ही आपापला धंदा करतो. पूर्वी आंध्र प्रदेश, तमिळनाडू या राज्यांतून मोठ्या प्रमाणावर तृतीयपंथी यायचे. आता महाराष्ट्रातलेच जास्त आहेत. तमिळनाडूमध्ये तृतीयपंथीयांसाठी खूप चांगल्या योजना आहेत. तिथे त्यांना रेशन मिळते. नोकरीसोबत सन्माननही मिळतो. महाराष्ट्र सरकारची अशी काहीही धोरणे नाहीत. असे स्विटी ने सांगितले.

—•••—



# त्यांचं जीवन, त्यांची नाती

सीमा ( वय ४२) नेपाळी महिला

कानडी महिला महिन्यातून एकदा घर धुऊन स्वच्छ करतात. त्यासाठी सगळ्यांकडून पाच-पाच रुपये काढून झाडू, पोछा, निरमा आणला जातो. आमच्याकडे थोडी वेगळी पद्धत आहे. मुली, घरवाली, मॅनेजर सगळे मिळून महिन्याच्या एक तारखेला घर स्वच्छ करतात. बाकी महिनाभर एक बाई हे काम बघते. स्वयंपाकाची वेगळी आणि भांडी धुणारी वेगळी.

नेपाळी घरांमध्ये स्वयंपाकासाठी ठेवलेली बाईपण नेपाळीच असते. आधी धंदा करणारी आणि आता वय झाल्याने धंदा करू न शकणाऱ्या म्हाताऱ्या हे काम करतात. कानडी घरात असं नव्हतं. प्रत्येकीला स्वत:च जेवण बनवावं लागायचं. कपडे, मेकअप सगळं स्वत:च करायचं. तिकडे मालकीण काहीच द्यायची नाही. वाटलं तर हॉटेलमधूनही मागवायचो. तेव्हा स्वस्ताई होती. दहा रुपयांमध्ये किलोभर आटा मिळायचा. गहू आणून ते दळायचे. हे सारं मला माहिती नव्हतं आधी. साफसफाई, भांडी धुणं, पाणी भरणं या कामांसाठी वेगळी बाई ठेवली होती. आजारी पडलं तर उपचाराचा अर्धा खर्च घरवाली करायची. औषधपाणी आणि कधी ॲडमिट केलं तर त्याचा खर्च करायची. नंतर त्याचा हिशेब व्हायचा. (२००० ते २००५ चा काळ)





त्यावेळी चपाती, डाळ आणि भात असं माझं जेवण असायचं. बऱ्याचवेळा जेवणात मटणसुद्धा असायचं. मी पुण्यात आले तेव्हा मटण ६०-७० रुपये किलो मिळायचं, तर सोन्याचा भाव तोळ्याला ३००० रुपये होता. दोन-तीन रुपयांमध्ये क्वार्टरची अर्धी बाटली तेल मिळायचं. दोन रुपयांची इंदिरा गांधी साडी नेसायची मी. तेव्हाच्या आणि आताच्या किमतीत खूप फरक झालाय. तेव्हा २२० रुपयांत ग्रीन, तोहफा या हॉटेलमध्ये मस्त जेवण व्हायचं. आता मात्र दर खूपच वाढलाय. महिलाही बदलल्यात. जुन्या घरवाल्या राहिल्या नाहीत. तीन-चार जणींचं निधन तर माझ्यासमोर झालंय. ताराबाई, हिराबाई थोरातपण गेल्या. आता चार-पाच जणीच राहिल्या आहेत. त्यातली एक शांताबाई आहे.

मला पहिल्यापासून हिंदी समजतंय. मी आसाममध्ये राहात असल्यामुळे मला नेपाळी भाषा समजायची नाही. हळूहळू ती भाषा शिकले. आता मराठीही शिकले. जास्त समजतं, पण बोलायला जमत नाही. कानडी, हिंदी, मराठी येतं. इथले नेपाळी लोक त्यांच्या भाषेत बोलतात; पण माझं माहेर आसाम आहे, त्यामुळे माझी मूळ भाषा आसामी आहे.

कोकणातला एक 'मरद' (पुरुष) ठेवला होता. त्याला माझ्याकडे किती पैसे आहेत ते सगळं सांगितलं नाही. बावन्न हजार रुपयांना एक लहान खोली घेतली. तो म्हणाला, 'मी तुला सांभाळतो. खाण्या-पिण्याचा सगळा खर्च करतो, पण धंदा नाही करायचा.' माझा मुलगा त्यावेळी सहा वर्षांचा होता. त्यानी नाही म्हटलं तसा मी धंदा बंद केला. मी इथंच गल्लीत रहायची आणि चुरमुर्याचा चिवडा विकायची. हा व्यवसाय सुरू केला, तेव्हा बाकी नेपाळी लोकांशी माझी दोस्ती झाली. माझा मरद मुंबईहून कपडे, बांगड्या घेऊन यायचा आणि मी गल्लीत बसून त्याचा व्यापार करायची. कपडे विकणार्यांशी दोस्ती केली. सात-आठ महिने हा व्यापार केला. लोक पैसेच द्यायचे नाहीत. रोज-रोज कसं पैसे मागणार त्यांच्याकडे. कपडे

विकायची लाज वाटू लागली. या व्यवसायात  तब्बल दहा हजार रुपयांचा तोटा झाला.

## आपली माणसं

मी परत एक मरद ठेवला. तो म्हणाला की, आता हे काम नाही करायचं. मग आम्ही कात्रजमध्ये राहू लागलो. त्याचे आई-वडील त्याला घेऊन गेले, तरी मी दोन-तीन महिने तिथेच राहिले. बाहेरची कामं केली. धुणीभांडी केली. एका घरातील कामाचे ५० रुपये मिळायचे. बाहेर राहण्यात सन्मान आहे. तीन महिने मी हे काम केलं. महिन्याला दीडशे रुपये मिळवायचे मी. त्यावेळी पोटुशी होते. आसपासचे सगळे म्हणायचे की, तुला कोण सांभाळणार? ते खरंच होतं. त्यावेळी घरात पुरुष नव्हता. मग मी बुधवार पेठेत आले.

दत्त मंदिराजवळ चार घरं होती. त्या घरात मुंबईहून माझ्यासोबत आलेली महिला रहायची. तिनं मला आधार दिला. माझा यार म्हणायचा, 'धंदा करू नको...' पण महिन्यातून दोनदा येणाऱ्यांवर मी कसा भरोसा ठेवणार? म्हणूनच म्हणतात, 'भडवा किसी का मर्द नही होता और रंडी किसी कि औरत नहीं होती.'

मूल व्हायच्या आधी नव्वद हजार रुपये आणि पाच तोळे सोनं घेऊन मी माझ्या घरी गेले होते. दोन वेळा गेले; पण घरात नाही घेतलं. मुलगा शंभर वेळा घर सोडून गेला तरी त्याच्यासाठी घराचं दार नेहमीच उघडं असतं. मुलगीच्या बाबतीत मात्र तसं होत नाही. त्या घरांचे दरवाजे तिच्यासाठी कायमचे बंद होतात. ज्या आईनं जन्म दिला, तिनंच माझ्याकडून वचन घेतलं 'मेले तरी घरी परतणार नाही. मी तिकडे परत नाही गेले. माझं सासर अन् माहेर दोन्हीही बुधवार पेठच. ही पेठ मात्र चांगली नाही. इंदिरानगर (कात्रजचे घर) चांगले आहे. संस्थेत येण्यासाठी इथं यावं लागतं.



माझं बाळ जन्माला आलं, तेव्हा त्याचं वजन कमी होतं. त्यामुळे त्याची अधिक काळजी घ्यावी लागली. जेवढे कमावले तेवढे त्याच्यावर खर्च केले. त्यावेळी घरवालीनं मला सांभाळलं. बाळ लहान असल्याने दोन-चार महिने धंदा केला नाही. स्वतःजवळ जेवढे पैसे होते त्याच्यावर पोटापाण्याचं भागविलं. बाळ मोठं झाल्यावर त्याला समज आली. गिऱ्हाईकासोबत बाहेर जाताना कुणाला बरोबर घेऊन जातेस असं ते मला विचारू लागलं. त्याच्या प्रश्नाला काय उत्तर द्यायचं? त्यामुळे खूप अस्वस्त व्हायचे; पण पर्याय नव्हता. म्हणून मी बाहेर खोली घेऊन राहू लागले.

त्यानंतर मी धंदा करणाऱ्या इतर बायकांच्या मुलांना सांभाळायला लागले. ही मुलं पूर्ण वेळ माझ्यासोबत असायची. त्याचे महिन्याला तीन- चार हजार रुपये मिळायचे. आजपर्यंत साठ-सत्तर मुलं तरी मी सांभाळली असतील. एका वेळी तीन ते पाच मुलं असायची माझ्याकडं. अगदी आठ-पंधरा दिवसांपासूनची बाळं पाच-सहा वर्षांची होईपर्यंत मी सांभाळली आहेत. दोन मुलं अशीच सोडून त्यांच्या आया निघून गेल्या. त्यातली एक पाच वर्षांची मुलगी माझ्यासोबतच राहते. एक मुलगा वर्षाचा असताना त्याची आई निघून गेलेली. आता तो लोणावळ्यात नववीच्या वर्गात शिकतोय.

माझा मुलगा परशुराम सातवीपर्यंत नूतन समर्थ शाळेत शिकला. पुढं दहावीपर्यंतचं शिक्षण आरसीएम गुजराती शाळेत झालं. आता तो त्याच्या बापासारखाच कुक झालाय. महिन्याला वीस हजार पगार आहे त्याला. परशुराम आता 23 वर्षांचा आहे. इतकी वर्षे मी हे काम केलं नाही. अप्पर इंदिरानगरमध्ये घर घेतलं. माझ्या पार्टनरचं लग्न करून दिलं. त्याला एक मुलगा आणि एक मुलगी आहे. त्याला मी सांगितलं, 'माझा मुलगा आता मोठा झालाय, इकडं जास्त येत जाऊ नकोस म्हणून...' महिन्यातून दोनदा येतो. किराणा भरतो. मुलाला सुखात

ठेवतो. माझ्यासाठी हेच खूप आहे.

► **लता (वय ५२ वर्षे), स्थानिक मराठी महिला**

अख्ख्या गल्लीत मी दिसायला खूप सुंदर होते. मला धंद्याची कमी नव्हती. मी खूप कमावले आणि खूप उडवलेदेखील. एक यार सोडला की दुसरा यार, असं करत राहिले. सगळं आयुष्य हुल्लडपणात गेलं. कधी पैशाला पैसा धरला नाही. म्हणूनच आता भांडी घासायची वेळ आलीय माझ्यावर. मला जितेंद्र, धर्मेंद्र, राजेश खन्नाचे सिनेमे खूप आवडायचे. जुनी गाणी मला खूप आवडतात. ऐकताना डोळ्यात पाणी येतं.

धंद्यात महिलेने १०० कमावले की, ५० रुपये मालकिणीकडे जातात आणि उरलेल्या पैशात तिला जेवण, औषध, कपडालत्ता आदींवर खर्च करावा लागतो. प्रत्यक्ष त्यांच्या पदरी काहीच पडत नाही. जे कर्ज घेतात त्यावर महिन्यावर १० टक्के व्याज द्यावं लागतं. दोनवेळचं जेवायला मिळतं आणि एक सिक्युरिटी आहे. घराबाहेर पडल्यावर त्यांना कोण सोडणार आहे. म्हणून त्या इथे आनंदात आहेत. क्वचित मित्र मिळाल्यावर त्याच्याबरोबर पळून जातात. फार कमी महिलांचं भलं झालं आहे.

गेल्या सात वर्षांपासून मी एचआयव्ही पॉझिटिव्ह आहे. माझ्या दोन्ही मुलांना मात्र लागण झालेली नाही. इथं माझी खूपच दैना झाली. मग मी गल्लीतून बाहेर पडले. एका नवर्यासोबत जवळपास ११ वर्षे राहिले. नंतर पुन्हा गल्लीत गेले. त्यानंतर सपना हॉटेलमध्ये कामाला लागले. त्यांनी मला सांभाळून घेतलं. आता सर्वांची आर्थिक परिस्थिती सुधारली आहे. जगणं सुधारलं आहे. आता फार गरीब असं कुणी नाही. पूर्वी बायका भजी-पाव खाऊन दिवस काढायच्या. मुलांना सांभाळणं



अवघड होतं. गिर्हाईक आल्यावर मुलांना थोडे पैसे देऊन रस्त्यावर सोडून द्यायचं. आता मुलांना चांगल्या शाळेत घालतात. जी मुलं इथे राहिली ती बिघडली. इथली जी मवाली, गुंड मुलं आहेत, या बायकांचीच आहेत. त्यांच्यावर कुणाचंच नियंत्रण नाही.



► **सोनी (वय ३६ वर्षे), बंगाली महिला**

इथे राहात असताना मला एक मारवाडी भेटला होता. तो माझे सगळे पैसे खर्चून पळून गेला. त्याने माझ्याशी लग्न केलं होतं. एक मूल दिलं त्यानं. तो बुधवार पेठेतला नव्हता. फर्निचर बनवायची कामं करायचा. ड्रायव्हिंगपण करायचा. त्याने माझ्याकडचे बरेच पैसे संपवले. त्या वयात मला फारशी समज नव्हती. नेपाळी घरवालीकडे असताना तो मला भेटला. खूप मारायचा. शिव्या द्यायचा. भावाच्या लग्नाला जातो म्हणून गेला आणि स्वत: लग्न करून आला. मला जोधपूरला घेऊन गेला होता; पण त्याने त्याचं घर दाखवलं नाही. आता तो लोहगावला राहतो. त्याने लग्न केलेल्या बायकोलाही मुलगा झाला आहे. तो मारवाडी आता मला खर्चाला पैसे देत नाही.

गल्लीतल्या एकाला मी भाऊ मानते. त्याचं नाव अरुणभाई. त्याला मी सांगितलं की, आता मी खूपच कठीण परिस्थितीतून जात आहे. एखाद्या संस्थेबरोबर माझी ओळख करून दे. माझ्या पाठीशी कोणीही नाही.' असं सांगितल्यावर त्याने अगोदर माझी कमला नेहरू हॉस्पिटलमध्ये डिलिव्हरीची व्यवस्था केली. त्याकाळातली माझी सर्व उस्तवार त्याने केली आणि माझं हॉस्पिटलचं बिलसुद्धा भरलं. त्यानंतर मी रुबी हॉल हॉस्पिटलमध्ये गेले. तिथे मुलाची तपासणी केली, तर कळलं की त्याच्या हृदयाला भोक आहे. मला धक्काच बसला.

मग दवाखान्याच्या वार्या सुरू झाल्या. त्यामुळे २० हजारांचं कर्ज झालं. त्याअगोदर मी संस्थेकडून ५०-६० हजार रुपये घेतले होतं; तेपण परत करायचं आहे. खोलीचं भाडं भरणं मला शक्य नव्हतं म्हणून मी परत घरवालीबरोबर अर्धेलीने काम करायला लागले. काही अडचण आली, तर मी घरवालीकडे पैसे मागते.

इथे माझी कोणी मैत्रीण नाही. एकटी राहते. पूर्वी नेपाळी बायकांमध्ये राहायची. १५०-२०० बायका होत्या. कोणी घरवाली झाली, तर कोणी बाहेरवाली,जशी मी. काहीजणी गावाला गेल्या. तो ग्रुप सुटल्यावर परत कोणता ग्रुप तयार झाला नाही.

► **बी पन्ना (५२ वर्षे) - तृतीयपंथी**

मी एक मुलगी दत्तक घेतली आहे. ती आता हैद्राबादजवळ कॉन्व्हेंटमध्ये शिकतेय. मी तिला माझी ओळख सांगितलेली आहे. मीच तुझी आई आणि मीच तुझे वडील असल्याचं सांगून मोकळी झाले. खरी गोष्ट मी तिच्यापासून का लपवू? तिलाही काही हरकत नाही, याचा मला आनंद आहे.



# आर्थिक गणितं

इथं व्याजावर पैसे देणारे मुख्य तीन लोक होते. सरदार बाबा, कादर बाबा आणि नाना पेठवाले, असे ते तीन व्याजदरी. सरदार बाबा गाडीखान्याजवळच्या दवाखान्याच्या पाठीमागे राहतात. तेव्हा ते शंभर रुपयाला महिना दहा ते पंधरा रुपये व्याज घ्यायचे. महिलांना पाच ते दहा हजारापर्यंत कर्ज द्यायचे. मालकिणींना पन्नास हजार किंवा त्याहून मोठ्या रकमा दिल्या जायच्या.

डॉ. घियांच्या मते, या महिला प्रेमात पडून किंवा स्वेच्छेने आल्या असतील, त्यांना कुणी उचलून आणलं असेल किंवा त्यांचा व्यापार करून इथं आणलं असेल, अशा महिलांचं इथे स्वत:चं असं काहीच नाही. दिवसाला २-३ हजार मिळवूनही त्यांच्या हातात काहीच पडत नाही. त्या कर्जातच मरून जातात. त्यांच्या कर्जाचे हिशेब कधीही न कळण्यासारखे आहेत.

अगदी थोड्या महिला बँकेत खाते उघडून पैसे ठेवतात. बहुतेकजणी मात्र ट्रंकेत पैसे सांभाळून ठेवतात किंवा विश्‍वासू व्यक्तीकडे ठेवायला देतात. आपल्या कमाईतून या महिला पोस्टाने मनीऑर्डरने किंवा चेकने नियमित त्यांच्या घरी पैसे पाठवितात. हा नेम त्या चुकवत नाहीत. जणू त्या घराशी असलेले भावबंध टिकवून ठेवण्याचा त्यांच्या परीने प्रयत्न करतात. त्यांना पैशाची गरज भासली की, त्या खासगी सावकारांकडून कर्ज घेतात.





धंदा करणार्‍या महिलांची कमाई त्यांच्या पार्टनरच्या दारू-चिकनवरच खर्च व्हायची. त्यांना वाटायचं की, हा आपल्याला सांभाळतो, आमचं संरक्षण करतो, म्हणून त्या आपली कमाई त्याच्यावर उधळायच्या. मग गुंड प्रवृत्तीचे लोक त्यांचा फायदा घेतात. हे माझ्या लक्षात आलं, तेव्हा मी त्यांना म्हटलं, मी तुमचा भाऊ आहे. तुम्ही कोणत्याही दबावाला बळी पडू नका. तुमची कमाई अशी लुटू देऊ नका. मी तुमचं संरक्षण करतो. मग मी त्यांना बँकेत खाती काढायला लावली. सुवर्ण सहकारी बँकेत अनेकजणींनी खाती काढली. त्यांची कमाई रोजची असते म्हणून आम्ही डेली कलेक्शनची पद्धत ठेवली. मग एकेकीच्या खात्यावर पैसे साठत गेले. मालाबाई, रेणुका, शांताबाई कट्टीमणी, सायराबी अशा कितीतरीजणी करोडपती झाल्या. काहींनी तर आपल्या गावी जमिनी घेतल्या. पैसे साठवण्याबरोबरच मुलांच्या शिक्षणावरही आम्ही भर दिला," असं शांतिलाल सूरतवाला यांनी सांगितलं.

## ● सेक्स वर्करच्या जमा-खर्चाचा ताळेबंद

### ► सुरुवातीची साधारण पाच वर्षे

सुरुवातीची वर्षे ही चांगल्या कमाईची वर्षे असतात. मात्र जबरदस्तीने या धंद्यात आलेल्या महिलांची कामाची सुरुवातच कर्जाने झालेली असते. घर मालकिणीने नातेवाईक/दलालाला दिलेल्या मोबदल्याची परतफेड साधारण १० टक्के व्याजाने करावी लागते.

त्यांची कर्जफेडीनंतर कमाईची सुरुवात होते. सुरुवातीला कमाईपेक्षा खर्चच जास्त होतो. सर्व खर्च वजा जाऊन काही पैसे तिच्या हाती पडतात. कमाईतील ५०

टक्के हिस्सा घरवालीला आणि ५० टक्के सेक्स वर्करला तिच्या नियमित खर्चांसाठी म्हणजे अन्नधान्य, तयार जेवण/पदार्थ, कपडे, मेक अप, धुणीभांडी, सफाई, फोन आणि व्यसन लागतात. त्याचबरोबर आरोग्यावरही बराच खर्च होत असतो. सर्वसाधारण आजार, मुलांचे आजार, तसेच स्त्री रोग, प्रजनन, पाळीचा त्रास, गर्भधारणा, गर्भपात, बाळंतपण आणि कुटुंबात कुणाचेही गंभीर आजार असोत यावरदेखील पैसे खर्च होतात. वरील खर्चांखेरीज आणखी मोठे, महत्त्वाचे खर्च म्हणजे घरी पाठवायचे पैसे आणि पार्टनरला द्यायचे पैसे

► **नंतरची पाच ते दहा वर्षे**

५०% कमाई स्वत:कडे कमाईचे ५०% घरवालीला भाडं आणि सुविधांपोटी. पार्टनर नसेल तर तिची कमाई तिच्यापाशी राहते, अन्यथा त्याच्या गरजांप्रमाणे कमाईला वाटा फुटतात.

कमाईचा मोठा भाग वरीलप्रमाणे नियमित खर्चांसाठी आणि स्वत:च्या, मुलांच्या, कुटुंबीयांच्या आरोग्यासाठी खर्ची पडतो. याखेरीज घरी पाठवायचे पैसे, मुलांचं शिक्षण यांवरही मोठा खर्च होतो.

► **त्यानंतरची १० -२० वर्षे**

वय झाल्याने धंदा कमी, रेट कमी त्यामुळे कमाईही कमी. कमाईचा मोठा भाग वरीलप्रमाणे नियमित खर्चासाठी आणि स्वत: च्या, मुलांच्या, कुटुंबीयांच्या आरोग्यासाठी खर्ची पडतो. याखेरीज घरी पाठवायचे पैसे, मुलांचं शिक्षण यावरही मोठा खर्च होतो. खर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठी बचत (दागिने/जमीन/ बँकेतील ठेवी) उपयोगी पडते, अन्यथा कर्जावर विसंबून राहावे लागते.



# सहजीवन

गजरेवाला आणि शनिवारचा लिंबू-मिरचीवाला यांच्याव्यतिरिक्त त्यावेळी म्हणजे १९८० च्या दशकात कोणीही विक्रेते या गल्लीत यायचे नाहीत. जेवण विकणारे तर त्यावेळी नव्हतेच. आम्ही घरीच स्वयंपाक करायचो. आमच्यातली एकजण आळीपाळीने सगळ्यांचा स्वयंपाक करायची. आता बाहेरून आणतात किंवा स्वयंपाकाला बाई ठेवतात. तेव्हा नवरंग हॉटेल बिर्याणीसाठी फेमस होते. २५ रुपयांना मटण बिर्याणी मिळायची.” लताने सांगितलं.

डॉक्टर म्हणून या महिलांशी माझे संबंध खूपच चांगले होते. त्या आम्हाला खूप मान द्यायच्या. आम्हाला देवच मानायच्या त्या. त्यांच्या नशिबाने त्या या धंद्यात आलेल्या. यल्लमा देवीच्या पूजेला मला बोलवायच्या. खेडेगावात डुक्कर असलं की, ते गाव स्वच्छ करतात, असं मानतात, तशाच प्रकारचा हा धंदा आहे का असंही मनात येतं" डॉक्टर घियांनी म्हटलं. या महिला नेहमी मालकीण किंवा मॅनेजरच्या ताब्यात असतात. काही वर्षे धंद्यात काढली की मग त्याही कुठे जात नाहीत. समाज, घर त्यांना स्वीकारणार नाही, याची त्यांना खात्री असते. मग त्या मालकिणीपासून स्वतंत्र होतात, अशा स्वतंत्र झालेल्या
महिला एकेकटीने माझ्याकडे उपचाराला येतात." डॉ. घिया म्हणाले.

पेशंट म्हणून या महिला माझ्याकडे आल्यामुळे काही प्रश्न येत नाही. कारण, इथे आल्यावर त्या इतरांकडे मान वर करूनही पाहात नाहीत. त्यांना प्रेमाचे दोन शब्द हवे असतात. त्यांच्यामुळे माझ्या प्रॅक्टिसवर कधीच काही परिणाम झाला नाही. गल्लीत उभं राहून त्यांच्याशी बोलायलाही मला काही वाटत नाही. कारण, मी डॉक्टर आहे हे सर्वांना माहीत आहे.






मी इतरांना काही सांगणार नाही, याची खात्री झाली की त्या माझ्याजवळ मन मोकळं करतात. इतकं की त्यांचा इथून पाय निघत नाही. त्यांची ही भावनिक भूक समाज समजून घेत नाही आणि त्यांना त्यांचं काम करत जगूही देत नाही. "आळंदीच्या एका मुलाने इथल्या दक्षिण भारतीय सुशिक्षित मुलीशी लग्न केले. दोघेही एचआयव्ही पॉझिटिव्ह होते. मुलाच्या वडिलांचा विरोध होता. मग मी त्यांना समजावलं की दोघांना दु:खात एकमेकांची साथ होईल, तेव्हा त्यांनी मानलं. लग्नानंतर काही काळानं मुलगा मरण पावला. त्यानंतर कधीतरी एकदा त्यांच्या घरी गेलो असताना वडिलांमध्ये झालेला बदल दिसून आला. त्यांनी सुनेला आपलं मानलं होतं. म्हणाले की 'ही मुलगी माझ्यानंतर सगळं बघेल.' तिने त्यांच्या एका दुकानाची पाच दुकानं केली होती. अशा लग्न करून संसार करणाऱ्या महिलाही आहेत."

डॉ. घिया यांनी म्हणतात," या बायकांचं जास्तीत जास्त वयोमान साठीपर्यंत आहे. सर्वसामान्यांसारख्या आजारांबरोबरच टीबी, एचआयव्हीचे प्रमाण त्यांमध्ये खूप जास्त आहे. बऱ्याचशा महिला पन्नाशीनंतर त्यांच्या गावाला निघून जातात. विशेषतः नेपाळी महिला आपापल्या गावी परततात."

वयानुसार धंदा कमी झाला की कमाईचे इतर पर्यायही या महिला शोधातात. त्याबद्दल सीमा सांगते, "मंडईत जाऊन मी दहा रुपयांचे चुरमुरे आणि दहा रुपयांचे फुटाणे, शेंगदाणे, कोथिंबीर, कडिपत्ता असं सगळं सामान घेऊन यायचे. त्याचा गरमागरम चिवडा बनवून पाच रुपये कप या दराने विकायचे. बुधवार पेठेतल्या दुकानात थोडीफार ओळख आहे. त्यांना 'भाई' म्हणतो आम्ही. ओळख आहे, विश्वास आहे त्यामुळे माल उधारीवर मिळतो. आजारपणात खासगी डॉक्टरकडेच जावं लागतं. पैसे नसले तर सरकारी दवाखान्यात उपाचार घ्यायचा. आता जवळ कोणी नाही. संस्थावाले आणि घरवाली यांनी खूप साथ दिली. काही

झालं तर पोलीस ससून रुग्णालयात पाठवतात.” “एकीकडे सेक्स वर्करचा धंदा चालायचा, तर दुसरीकडे बाकी दुकानं, धंदे चालायचे. दोन्ही धंदे सोबत चालायचे; पण त्या महिलांचा, त्यांच्या गिऱ्हाईकांचा आम्हाला कसलाच त्रास नव्हता. बुधवार पेठ म्हटले की बाहेरच्या लोकांच्या भुवया उंचावायच्या. पण आमचे नाते शेजाऱ्यांसारखे होते. ” इथे दीर्घ काळ कापडाचे दुकान चालवणार्या किसन मुळे या ज्येष्ठ व्यापाऱ्याने सांगितले.





# नागरिक म्हणून ओळख

सेक्स वर्करसाठी खऱ्या अर्थाने उपयोगी दस्तावेज दोनच; एक रेशन कार्ड आणि दुसरे पॅन कार्ड. रेशन कार्डमुळे सवलतीच्या दरात धान्य मिळते. सरकारी रुग्णालयात मोफत आरोग्य सेवा मिळते आणि मुलांच्या शाळा प्रवेशासाठीही मदत होते.

२००६ पर्यंत सरसकट सर्वच महिलांकडे किंवा बहुसंख्य जणींकडे सरकारी दस्तावेज आहेत, अशी परिस्थिती नव्हती. काही थोड्याच महिलांकडे रेशन कार्ड होते आणि काहींचे नाव मतदार यादीत होते. यापलीकडे कोणताही औपचारिक सरकारी कागद वा ओळखपत्र कुणाकडेच नव्हते.

सेक्स वर्कर्सना पिवळं म्हणजे बीपीएल कार्ड दिलं जावं, हा सरकारी अध्यादेश २०१२ मध्ये लागू झाला. त्यानुसार सहेली संस्थेने २०१२ ते १५ यादरम्यान जवळपास ६०० जणींना रेशन कार्ड मिळवून दिली. २०१५ पासून रेशन विभागाने पोलिस पडताळणी करायला सुरुवात केली. त्यानंतर रेशन कार्ड मंजूर करण्यापूर्वी अर्ज करणार्या महिलांकडचे इतर दस्तावेज, निवासी दाखला हे कागद तपासले जाऊ लागले. अशी कागदपत्रं मिळवणं महिलांना अवघड होऊ लागल्याने रेशन कार्ड मिळवण्यात अडचणी येऊ लागल्या. परिणामी २०१५ नंतर बुधवार पेठेत राहणाऱ्या एकाही सेक्स वर्करला रेशन कार्ड मंजूर झालेलं नाही.





२००५ पासून सहेली संघाने सेक्स वर्कर्सना सरकारी कागदपत्रं/ओळखपत्रं सार्वजनिक सुविधा मिळवून देण्यासाठी लक्ष्याधारित कार्यक्रमाची अंमलबजावणी करायला सुरुवात केली. सरकारी ओळखपत्रं आणि कागदपत्रं सेक्स वर्कर्सना या माध्यमातून मिळवून देण्यावर भर देण्यात आला. रेशन कार्ड आणि मतदार कार्ड, पॅन कार्ड मिळवून देणं राष्ट्रीयीकृत बँकेत खाते उघडणं , आदी बाबींचा यामध्ये समावेश होता. महिलांकडून मोठ्या रकमा घेऊन पॅन कार्ड काढून देणारे अनेक एजंट याकाळात बुधवार पेठेत तयार झाले होते.

अल्पवयीन मुलींची सुटका करण्याच्या निमित्ताने तेव्हा पोलिसांच्या सतत धाडी पडत होत्या, त्यामुळे प्रत्येकीच्या वयाचे प्रमाणपत्रही असावं, असंही सहेली संघाने ठरवलं. त्यासाठी ससून रुग्णालय आणि जिल्हा सिव्हिल रुग्णालयांशी संपर्क साधला; पण वयाच्या प्रमाणपत्रासाठी पोलिसांचं शिफारसपत्र आवश्यक असल्याचा नियम सांगून सरसकट दाखले दिले गेले नाहीत. काही मोजक्या महिलांनाच वयाचे दाखले मिळाले.

त्यानंतर आधार कार्ड मोहिमेची सुरुवात झाली. प्रत्येक सेक्स वर्करकडे स्वतःचे आधार कार्ड हवं, यासाठी सुरुवातीला खूप जोमात काम झालं. बुधवार पेठेत काम करणाऱ्या सर्वच स्वयंसेवी संस्थांनी यासाठी जोर लावला. कालांतराने आधार कार्डांची प्रक्रियाही सोपी राहिली नाही. काहीजणींचे आधार कार्ड, मतदार कार्ड त्यांच्या मूळ गावच्या पत्त्यांची आहेत.

वयाची साठी पार केलेल्या काही मोजक्या महिलांना संजय गांधी निराधार योजनेची मासिक पेन्शन मिळते. ज्यांची नावे पूर्वीपासून नोंद करण्यात आली आहेत, त्यांनाच हा लाभ मिळतो. आता नव्याने नावं समाविष्ट करणे अवघड झालं आहे.

सेक्स वर्कर्सना जनधन खाते उघडून देण्यात आली. कोविडकाळात ६० जणींच्या जनधन खात्यावर मार्च २०२० मध्ये ५५०० रुपये जमा झाले. ही रक्कम एकदाच जमा झाली.

महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातील सेक्स वर्कर्सकडे वरीलप्रमाणे सरकारी कागदपत्रं, ओळखपत्रं आहेत. खूप आधीपासून इथे असलेल्या नेपाळी सेक्स वर्कर आणि घरवालींकडेही मतदार कार्ड, पॅन कार्ड, रेशन कार्ड इत्यादी कागदपत्रं आहेत. अगदी मोजक्याच सेक्स वर्कर व घरवालींकडे त्यांची विमा पॉलिसी आणि मेडिक्लेमही आहे.

साधारण २००० च्या सुमारास देवदासी निर्मूलन योजना आली, जिचा लाभ काही देवदासींना मिळाला; अखिल बुधवार पेठ देवदासी संस्थेच्या डॉ. पूजा यादव यांच्या पुढाकारामुळे जवळपास २०० जणींना निर्वाह अनुदान मिळू लागले. सुरुवातील दरमहा ३०० रूपये मिळायचे, नंतर त्यात वाढ होऊन १००० रुपये मिळू लागले. मात्र, २००९ मध्ये ही योजना बंद करून अन्य सर्वसामान्य मासिक निर्वाह अनुदानाच्या योजनांमध्ये वर्ग करण्यात आली. यामुळे काहीजणींचा नियमित हातात येणारा निर्वाह वेतनाचा आधार बंद झाला.

नंतरच्या काळात या देवदासी निर्मूलन योजनेंतर्गत कोणत्याच महिलेला कुठलेच लाभ दिले गेले नाहीत. त्या लाभास 'पात्र' का ठरल्या नाहीत, याचे गमक या योजनेच्या चलाख नियमांमध्येच दडलेले आहे. या योजनेखाली वैद्यकीय उपचार वा त्यांसारखे लाभ मिळवण्यासाठी देवदासी महिलांना कर्नाटकमधील त्यांच्या मूळ गावच्या ग्रामपंचायतीचा देवदासी असल्याचा दाखला जोडावा लागत असे. कर्नाटकमधील गावांमध्ये 'देवदासीमुक्त' गाव असल्याची स्पर्धा चालू होती. अशी 'देवदासीमुक्त' म्हणून स्वयंघोषित गावे त्यांच्या गावात घर असलेल्या पण



पुण्यासारख्या ठिकाणी रेड लाईट एरियात धंदा करणाऱ्या देवदासींना दाखला द्यायला तयार नसायचे. परिणामी गरजू महिला योजनेपासून वंचित राहू लागल्या.

सेक्स वर्कर्सना जात प्रमाणपत्र मिळविण्यासही खूप अडचणी येतता. कारण, जात प्रमाणपत्रासाठी आवश्यक असणारी कागदपत्रं त्यांच्याकडे नसतात. मागास जातीसमूहांसाठी असलेले लाभ, विशेषत: मुलांच्या शैक्षणिक लाभाच्या योजना त्यांना मिळू शकत नाहीत.

इंदिरा गांधींच्या काळापासून मी मतदान करते," सीमानं सांगितलं. बुधवार पेठेत खूप काळ राहिल्याने इथे झालेल्या बदलांची ती साक्षीदार आहे. "आधी इथे शांतिलाल सुरतवाला नगरसेवक होते. नंतर आमच्यातल्याच 'न्यू वेलकम'मधल्या एका मॅनेजर बाईचा मुलगा दत्ता सागरे हा नगरसेवक झाला आहे. दत्ता सागरे आणि त्याचे दोन-चार साथीदार यांच्यासोबत आम्हा सर्वांची चांगली ओळख होती. आम्ही आमच्या गरजा त्यांना सांगू शकलो. नंतर मी बुधवार पेठ सोडून इंदिरानगर अप्पर मध्ये राहू लागले. तेव्हा तिथलं रेशन कार्ड काढून घेतलं. आता माझं मतदार कार्ड आहे. आधार कार्ड आहे. रेशन कार्ड आणि पॅन कार्डही आहे. माझ्या पार्टनरचंच नाव मी सर्व कार्डवर लावलंय. रेशन कार्डवर तेल, तांदूळ मिळतं" तिने सांगितलं.

मात्र अशी सरकारी कागदपत्रं सगळ्यांकडेच नाहीत. सीमापेक्षा चार वर्ष लहान असलेल्या सोनीकडे फक्त आधारकार्ड आहे. “माझं आधारकार्ड सिटी पोस्टच्या पत्त्यावर आहे. पॅन कार्ड अजून मिळालेलं नाही. त्यासाठीचा माझा अर्ज आणि फोटो दिला आहे. पण बुधवार पेठेतल्या मालकाने (नगरसेवक) हे काम आता थांबवलं आहे," असं तिनं सांगितलं. निवडणुकीच्या काळात जे लोक मत मागायला येतात, त्यांची नावंही मला माहीत नाहीत असंही ती म्हणली.

"गाडीखाना दवाखान्यात फुले आडनावाच्या नर्स होत्या. त्यांनी या महिलांचा विश्वास संपादन करून त्यांच्या नियमित तपासण्या केल्या. त्यांचं काम पाहून मी पुणे महानगरपालिकेच्या वतीने त्यांची तिथे नेमणूक करवून घेतली आणि त्यांनीही महिलांना चांगल्या आरोग्यसेवा दिल्या," नगरसेवक असताना ही कामं आवर्जून केल्याचं शांतिलाल सुरतवाला यांनी सांगितलं.

२२ मे, २००९ रोजी आम्ही तृतीयपंथियांनी मिळून आशीर्वाद संस्थेची स्थापना केली, आमच्या या संस्थेच्या वतीने आम्ही दररोज २०० मुलांना मोफत जेवण देतो. या संस्थेमार्फत इतरही कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. अशी माहिती पन्ना यांनी दिली.





# इतर धंद्यांमधील बदल

बुधवार पेठेत कितीतरी उद्योगधंदे चालायचे. काळानुसार त्यांचे स्वरूपही बदलत गेले. पूर्वी इथे राईस मिल होत्या. साधारण १९५० च्या सुमारास तांदळाच्या व्यापारासाठी बुधवार पेठेची ख्याती होती. त्यानंतर कापड बाजार तेजीत होता. बुधवार पेठेलगत भाजी मंडई आहे, शुक्रवार पेठ आणि रविवार पेठ हे होलसेल मालाचे बाजार आहेत. बाहेरून येणारे व्यापारी, शेतकरी त्यांचा माल विकायला किंवा विकत घ्यायला, या बाजारांमध्ये यायचे. तेव्हा त्यातील बरेचजण गिऱ्हाईक म्हणून बुधवार पेठेतल्या महिलांकडे जायचे.

एकूणच या भागात गजबज होती. त्याबद्दल इथले जुने कापड व्यापारी किसन मुळे सांगतात , "गावावरून आलेला शेतकरी मंडईमध्ये भाजी, फळं, धान्य विकायचा आणि त्याचे पैसे हातात आले की बुधवार पेठेत कपडे, सोनं विकत घ्यायचा." किसन मुळे यांचा स्वत:चा जन्म इथेच झाला आणि १९५१ पासून राहायलाही ते बुधवार पेठेतच आहेत. त्यांचं स्वत:चं दुमजली जुनं घर आहे. ही मालमत्ता त्यांच्या आजोबांच्या आणि वडिलांच्या कामातून तयार झाली आहे." (या पुस्तिका प्रकाशित होईपर्यंतच्या काळात त्यांचं निधन झालं.)






बुधवार पेठेत व्यापार धंदे खूप असल्याने बँकाही बऱ्याच होत्या" इथले आणखी एक जुने रहिवासी आणि व्यापारी असं प्रभाकर मोगल यांनी सांगितलं. "पूर्वी इथे इम्पिरिअल बँकेची शाखा होती. नंतर तिथे स्टेट बँकेची शाखाही सुरू झाली. त्याच्या शेजारी आमचं मोगल मार्केट होतं.

जवळपास ८००० चौरस फुटाच्या या प्रशस्त दुकानात सुई, किराणा मालपासून ते कन्फेक्शनरीपर्यंत सारं काही मिळायचं," असंही त्यांनी सांगितलं.

प्रभाकर मोगल म्हणाले, "संपूर्ण बुधवार पेठेत बँकाच बँका होत्या. इंडियन बँक, स्टेट बँक, इंडियन ओवरसीज बँक, सेंट्रल बँक. सराफी बाजार आणि होलसेल

मार्केट इथे असल्याने तब्बल १० ते १२ बँकांच्या शाखा इथे उघडण्यात आल्या. शहर वाढू लागलं, तसा बाजार दुसऱ्या ठिकाणी वाढू लागला आणि सोन्याचा धंदाही शहरात अनेक ठिकाणी विखुरला गेला."

पुण्याची शान असलेली सिटी पोस्टची इमारत १९२५ मध्ये बांधण्यात आली. नूमवि (नूतन मराठी विद्यालय), सेवासदन आणि हुजूरपागा या नामवंत शाळा इथून जवळच आहेत." मोगल यांनी सांगितलं, "आमची राहती इमारत बर्मा टिकने बांधण्यात आली. या इमारतीला २८ जिने आहेत. आमच्या घरासमोर प्लॉट होता. या जागेवर लक्ष्मी रोडवरची पहिली नऊ मजली इमारत उभी राहिली. तिथे जॉन बरेल नावाचं बुटाचं नावाजलेलं दुकान होतं.

पूर्वी बुधवार पेठेत दाट लोकवस्ती होती. १९५२ पासून मोगल इथे राहतात. तेव्हापासून इथे झालेले बदल त्यांनी जवळून पाहिले आहेत. "एकेका वाड्यात ५० मतदार असायचे. आता एकेक नागरिक बाहेर पडले. इमारती जुन्या झाल्या. रेड

लाईट एरियात राहणे लोकांना नको झाले. त्यानंतर धंद्याखेरीजच्या रहिवाशांची संख्या कमी होत गेली."

काही काळाने संध्याकाळनंतर लोकं इकडे फिरकेनाशी झाली. व्यापार धंदेही विखुरले गेले. इथला सोन्याचा, हार्डवेअर वगैरेंचा धंदा कमी झाला. ह्या धंद्यांसाठी लागणारी गोडाऊन पूर्वी इथे होती. आता त्याचं प्रमाण कमी झाले. ग्राहक थेट कंपनीकडून वस्तू मागवू लागले आहेत, अलिकडच्या काही वर्षात व्यापाराचे स्वरूप बदलत गेले. या साऱ्याच्या परिणामी गेल्या १०-१५ वर्षांत, म्हणजे २००५ नंतर इथे खरेदीसाठी होणारी माणसांची वर्दळ कमी होऊ लागली. पूर्वी असलेली चांगली लॉज आणि हॉटेलही बंद पडली.

मोगल सांगतात, "पूर्वी स्टेट बँकेसमोर एक निवासी इमारत होती. त्या मालकाने ती विकली. आता तिथे हार्डवेअरची दुकानं आहेत. त्याच्या पुढे कालेकर यांचं दुकान आहे. त्याच्या शेजारी कोंडे-देशमुख यांचं धान्याचं दुकान होतं. पूर्वी सार्वजनिक काका हॉल होता. तिथे शाहबाद स्टोन नावाचं दुकान होतं, जे आता कॅम्पमध्ये आहे. पूर्वी ज्या आख्ख्या इमारतीचं भाडं ३०० रुपये होतं, तिथे आज पाच मजली इमारती झाल्या आहेत.

जिथे आज हिजडे राहतात त्या ढमढेरे बोळात पूर्वी बदरीशेठची कोळशांची वखार होती. तिथेच दारूची दुकानं होती आणि हा धंदादेखील तेजीत चालायचा. तिथं रात्री माणूस गेला की लुटला जायचा, अशी त्या बोळाची ख्याती होती."

आमच्या दोन इमारतींमध्ये कर्नाटकातल्या महिला होत्या. त्या वर्षानुवर्षे इथे राहात होत्या. त्यांची शेती होतीच. आम्ही त्यांना पैसे दिले. आम्ही दिलेल्या १०-२० हजारांत त्यांनी तिकडे जमीन विकत घेतली. आता त्या तिकडे जाऊन शेती करतात, अशी माहिती प्रकाश मोगल यांनी दिली.



"सहेली'चं ऑफिस असलेल्या जुन्या वाळवेकर इमारतीमध्ये खाली कराची भजी, समोसेवाला होता. त्याच्या बाजूला टेलरिंग व्यावसायिक होता. भांड्याची दुकानंही आहेत."

इथल्या धंदा करणाऱ्या स्त्रिया, व्यापारी, रहिवासी यांनी पूर्वी एकमेकांना कसं स्वीकारलं होतं याची इथे अनेक वर्ष कार्यरत असलेले आणि इथूनच निवृत्त झालेले वरिष्ठ पोलीस निरीक्षक भानुप्रताप बर्गे यांची एक आठवण खूप बोलकी आहे. "बुधवार पेठेचा भाग फरासखाना पोलिस स्टेशनच्या हद्दीत येतो.

२०१४ मध्ये सामाजिक सुरक्षा विभागाचा प्रमुखपदाची जबाबदारी घेतल्यावर, पेशवेकाळापासून अस्तित्वात असलेल्या या वस्तीसाठी कुणी काहीही केलं नव्हतं, तिथे आम्ही पहिल्यांदाच दिवाळी साजरी केली. त्यावेळी प्रथम पूर्ण बुधवार पेठ स्वच्छ केली. दुसऱ्या दिवशी सडा टाकून झाल्यावर इथल्या महिलांना रांगोळी, पणत्या, आकाशदिवे आणि फटाक्यांचं वाटप केलं.

संध्याकाळी मांडव टाकून तिथे फराळाची व्यवस्था करण्यात आली. त्याला सर्वांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रत्येक प्रांतातल्या महिलांनी त्यांच्या पद्धतीची रांगोळी काढली. पहिल्यांदा त्या आमच्याशी बोलायला तयार नव्हत्या. परंतु, साफसफाई सुरू झाल्यानंतर त्यांच्यातल्या मुख्य असलेल्या महिला आमच्याशी बोलल्या आणि मग सगळ्याजणी या कार्यात सहभागी झाल्या"

"श्रीकृष्ण थिएटरच्या आसपास काही ख्रिश्चन महिला राहतात. त्यांच्यासाठी आम्ही चौकीत केक आणून ख्रिसमस साजरा केला, त्यामुळे वस्तीतलं वातावरण बदललं.

सोशल सेल प्रमुख म्हणून प्रत्येक घरात जाऊन चहा प्यायला सुरुवात केली. प्रत्येक महिलेला मी माझं व्हिजिटिंग कार्ड दिलं आणि त्यांना तीन गोष्टी सांगितल्या. कोणत्याही गिर्हाईकाला अनावश्यक त्रास द्यायचा नाही. तुमची स्वत:ची इच्छा असेल, तरच इथे थांबायचं नाही तर मला येऊन भेटलात तर मी तुम्हाला मदत करीन. आणि तिसरं म्हणजे कोणीही पोलिस तुमच्याकडे पैसे मागत असेल, तर मला येऊन सांगायचं. त्यामुळे या महिला माझ्याशी जोडल्या गेल्या होत्या."बर्गे म्हणाले.



## राजकारणी :
# कभी पास कभी दूर

पूर्वी बहुतेक महिलांकडे मतदार कार्ड होतं. ज्यांच्याकडे कार्ड होतं त्या मतदान करायच्या. स्थानिक नगरसेवकांशी त्यांचा संपर्क असायचा. शांतिलाल सुरतवाला इथे सलग तीन वेळा नगरसेवक म्हणून निवडून आले होते. ते महिलांच्या समस्या सोडवण्यासाठी मदत करायचे. महिला त्यांच्या प्रचारातही सहभागी व्हायच्या.

सुरतवाला यांनी सांगितलं, “निवडणूक लढवण्यासाठी  हा वॉर्ड निवडला तेव्हा मतदार कोण आहेत, याचा मी अभ्यास केला. त्यावेळी या सर्व मतदार काँग्रेसच्या बाजूने होत्या. मी अपक्ष होतो. माझ्या बाजूने त्यांना कसे वळवायचे, यावर आम्ही बराच विचार केला. मग मांगल्य कार्यालयात जाहीर कार्यक्रम आयोजित केला. या कार्यक्रमासाठी सर्व घरवाल्याना आमंत्रण दिलं. प्रत्येकीचा फुलं व मिठाई देऊन सत्कार केला. त्यांच्यासाठी काम करण्याची हमी दिली. त्यांनीही विश्वासाची परतफेड केली. त्याचवेळी नव्हे तर सलग तीनवेळा मला निवडून दिलं.”





“ मी नगरसेवक असताना ढमढेरे बोळातील मधुबाला, सुशीला या तृतीयपंथियांचाही मला पाठिंबा होता. त्यावेळी त्यांच्या संख्या ६५ होती. मधुबाला त्यांची लिडर होती. त्यांचे प्रश्न मी समजून घेतले.

१९९२ मध्ये मी महापौरपदावर असताना पुणे महानगरपालिकेत त्यांच्याकरिता नोकरीसाठी जागा तयार केली. प्रथमच तृतीयपंथी व्यक्ती कर्मचारी म्हणून कार्यालयात दाखल झाली, तेव्हा 'लिंग' काय लिहायचे, हा प्रश्न प्रशासकीय कर्मचाऱ्यांना पडला. ती व्यक्ती स्वत:ला जे मानते तेच लिंग कागदावर लिहायचे असे धोरण आम्ही तेव्हा ठेवले. म्हणजे  जर व्यक्ती स्वत:ला स्त्री मानते, तर स्त्री हे तिचे लिंग  असा विचार करून आम्ही हा पेच सोडवला,” असे सुरतवाला यांनी सांगितलं.

"१९८० पर्यंत बुधवार पेठ मतदारसंघात दहा हजार मतदार होते. त्यापैकी जवळपास एकतृतीयांश म्हणजे २९०० मतदार सेक्स वर्कर महिला होत्या. त्यांचं मलाच मतदान व्हायचं. मला प्रत्येक घराची खडान्खडा माहिती होती. त्यांचे प्रश्न सोडवायला मी मदत करायचो, नंतर काहींची नावे यादीतून गळाली. मतदारसंघाची रचना बदलली, प्रभाग आले. यात सेक्स वर्कर मतदार आणखी कमी झाल्या. त्या जर मतदारच  नाहीत तर त्यांच्या प्रश्नांकडे कोण लक्ष देणार? आज नगरसेवक त्यांच्याकडे फिरकतही नाहीत आणि आपल्या भागातले नगरसेवक कोण हे त्याही ओळखत नाहीत.” सुरतवाला म्हणाले.

त्यांच्या मते, बुधवार पेठेची अवस्था अशीच राहिली, तर या महिलांच्या परिस्थितीत काहीच फरक पडणार नाही. सरकारने त्यांच्या पुनर्वसनाची जबाबदारी घ्यायला हवी. सरकारला नवी जागा मिळवणं अवघड नाही.

हा व्यवसाय इथेच का, हा प्रश्न पडतो. या महिला मतदार झाल्या. त्यामुळे त्यांना नगरसेवकांचं संरक्षण मिळतं. २५ जणांची नावं असतील तर प्रत्येकी २०० रुपये देऊन त्यांना त्यांची मतं मिळविता येतात. त्यामुळे इथली वस्ती हलू शकत नाही. बुधवार पेठेत २९०० सेक्स वर्कर मतदार होत्या. त्यांचं मलाच मतदान व्हायचं. मला प्रत्येक घराची खडान्खडा माहिती होती. त्यांचे प्रश्न सोडवायला मी मदत करायचो, सुरतवाला म्हणाले.

राजकारण्यांचं नियंत्रण होतं, त्याचबरोबर पाठिंबाही होता. त्यांच्या परवानगीशिवाय काही व्हायचं नाही. शांतिलाल सुरतवाला यांना आजही तिथल्या म्हाताऱ्या महिला मानतात. दत्ता सागरे यांचा खूप प्रभाव होता; पण नंतरच्या काळात गिरीश बापट आल्यानंतर सगळं विस्कळीत झाल.

मरगी गल्ली, भोई गल्ली, दत्त मंदिर इथले लोक काँग्रेसलाच मत देणार हे ठरलेलं होतं. दाणे आळीचं काही कळायचं नाही आणि ढमढेरे गल्ली त्यांच्या खिजगणतीतही नव्हती. हे चित्र स्पष्ट होतं. आता ते सगळं बदललय. बंगाली महिलांचं वर्चस्व वाढलं आहे; पण त्यांचा मतदार म्हणून काही उपयोग नाही. पूर्वीच्या राजकारण्यांचे त्यांच्याशी आर्थिक संबंधही होते. बंगाली महिलांकडे कागदपत्रं नाहीत, त्यामुळे त्यांचे राजकारण्यांशी काही संबंधच येत नाहीत आणि आता तसे राजकारणीही राहिलेले नाहीत.

गेल्या १० वर्षांत बुधवार पेठेतील महिलांची संख्या खूप घटली. इथला धंदा कमी झाला. बदलत्या धंद्याचे स्वरूप सांगताना सेवेकरी म्हणाल्या, "आता या महिला रेड लाईट एरियाबाहेर जाऊन धंदा करू लागल्या आहेत लॉजवर धंदा करायला लागल्या आहेत.



हे सगळं पोलिसांनाही माहीत असतं. जोवर वस्ती एकजिनसी, एका जागी होती तोवर महिलांसाठी काही करता येत होतं, जे आज धंदा विखुरल्याने खूप कठीण झालं आहे. "

पूर्वी काँग्रेसचं प्राबल्य होतं. नंतर गिरीश बापट म्हणजे भाजपचा वरचष्मा राहिला. त्यानंतरचे बदल सांगताना सेवेकरी म्हणाल्या, "बापट इथे आल्यापासून इथल्या तरुण मंडळांचं गणितंच बदलून गेलं आहे. त्यांचे बिल्डर्सशी जास्त संबंध आहेत, त्यामुळे त्यांच्या काळात अनेक वाडे पाडून तिथं इमारती बांधल्या गेल्या.

आता त्यांना इथल्या लोकांपेक्षा इथल्या प्रॉपर्टीत जास्त रस आहे. पूर्वी दोन-तीन मुख्य मोजकी तरुण मंडळं इथे होती. आता अनेक छोटी मोठी मंडळं झाली आहेत, जी राजकीय नेतेमंडळींसाठी काम करताहेत. हे स्पष्ट आहे की प्रस्थापित राजकीय पुढाऱ्यांना इथलं सर्वकाही व्यापाऱ्यांच्या हाती द्यायचं आहे.

त्यामुळे इथले व्यवसाय, धंद्याची घर एकेक करून कमी कमी होतानाच दिसताहेत. सिटीपोस्टच्या मागे पूर्वी कितीतरी कॅसेटची दुकानं होती, ती सारी बंद झाली. त्याच्या आजूबाजूची धंद्याच्या महिलांची घरंही आता बंद झाली आहेत."

धंद्यावरच्या परिणामाबद्दल सांगताना त्या म्हणतात, "मधे एक काळ असाही होता जेव्हा महिलेचं नाव मुस्लीम असेल आणि ती बंगाली असेल तर ती चटकन पोलीस कारवाईची लक्ष्य व्हायची. इथे राहणाऱ्या महिला आपापसात धर्मावरून भेदभाव करत नाहीत, कारण सगळ्याच जगण्याच्या प्रश्नाचं उत्तर शोधायला इथे आलेल्या आहेत.

राजकारण्यांचं पाठबळ कमी झाल्यानं, पोलिसांच्या रेड आणि राऊंड वाढल्यानं इथला धंदा एकंदरच कमी झालाय आता. महागाई वाढलीय आणि त्यामुळेही गिर्हाईकं कमी झालीत. इथल्या महिलांना आता बाहेर जाऊन गिऱ्हाईक करावी लागत आहेत. लॉजवर, दुसर्या गावात जाऊन राहावं लागतंय."



# बदलत्या बाह्यरूपाच्या अंतरंगात

बुधवार पेठ कालानुरूप खूपच बदलली आहे. इथल्या इतर धंद्यांचे स्वरूपही बदलत गेले. लालबत्तीचा व्यवसायही बदलत्या परिवेशात चालू राहिला. बुधवार पेठ ही या महिलांची कामाची जागा आहे, तशीच रहायचीदेखील जागा आहे. सध्या इथली घरांची रचना कशी आहे?

बुधवार पेठ आणि शुक्रवार पेठ येथील वेश्या वस्तीमध्ये एकूण ९७ मालमत्ता आहेत. यामध्ये साडेचारशेहून अधिक धंद्याची घरं आहेत. जुने वाडे आणि नवीन इमारती अशा दोन्ही प्रकारच्या घरांच्या रचना इथे आढळतात. मालमत्तेच्या सरकारी नोंदी साधारणपणे १९३३ पासून आढळून येतात. जे जुने वाडे आहेत, त्यामधील ९० टक्क्यांहून अधिक धंद्याची घरं घरवालीकडे मालकीहक्क असलेली आहेत. विशेषतः मरगी गल्ली आणि शुक्रवार पेठ येथील घरं कर्नाटकातील घरवाल्यांच्या मालकीची आहेत. वाडे पाडून बांधलेल्या नवीन इमारतींचा मालकीहक्क ज्या व्यक्तींकडे आहे, त्यातील ९० टक्क्यांहून अधिक व्यक्ती धंद्याशी संबंध नसलेल्या आहेत. विशेष म्हणजे त्या व्यक्ती बुधवार पेठ किंवा शुक्रवार पेठ येथे न राहणाऱ्याआहेत.

ढमढेरे गल्लीतील ज्या घरांमध्ये तृतीयपंथी धंदा करायचे, त्या घरांची मालकी त्यांच्याकडे नाही. नवीन चार घरंच तृतीयपंथियांच्या मालकीची आहेत.



घरांमध्ये तृतीयपंथी धंदा करायचे, त्या घरांची मालकी त्यांच्याकडे नाही. नवीन चार घरंच तृतीयपंथियांच्या मालकीची आहेत. जी घरं घरवाल्यांच्या ताब्यात आहेत, त्यांचा मालकीहक्क तसेच भाडेपावतीमुळे प्रस्थापित झालेला हक्क वारसाहक्काने एका पिढीकडून दुसर्या पिढीकडे गेलेला आहे. गेल्या दहा वर्षांत यात काही प्रमाणात बदल झालेला दिसतो. धंद्याची मालकीण असलेली महिला जास्त करून या वस्तीत  राहात नाहीत.  घर चालवण्याची जबाबदारी मॅनेजरवर सोपवलेली असते. तर स्वतंत्रपणे धंदा करणाऱ्या अनेकींना धंद्यासाठी खोल्या भाड्यानेही दिल्या जातात.

भाडेकरू पोटभाडेकरू ठेवण्याचे प्रमाण सर्वसामान्यपणे आढळून येते. अनेक ठिकाणी बेकायदेशीर पोटमाळे किंवा पार्किंगमध्ये छोटी तात्पुरती बांधकामेही केलेली आढळतात. या सर्व खोल्या भाड्याने दिल्या जातात. एका खोलीचे भाडे साधारणपणे पाच ते सात हजार रुपये असते आणि डिपॉझिट पंचवीस हजारांपर्यंत घेतली जाते. काही घरवाल्या आणि महिला दररोज अडीचशे ते तीनशे रुपये भाडे देतात. वाडा पद्धतीमध्ये खोल्या थोड्या मोठ्या होत्या; पण नंतर धंद्यासाठी अनेक छोट्या छोट्या खोल्या तयार केलेल्या दिसतात. या खोल्यांमध्ये हवा आणि उजेड याचे प्रमाण खूपच कमी आहे. शौचालय आणि मोरी तर संपूर्ण वाड्यात एक किंवा फार फार तर दोनच असल्याचे दिसते.

काही वाडे अजूनही भक्कमपणे उभे आहेत, तर काही मोडकळीला आले आहेत. मरगी गल्लीतील क्रांती चौकातील वाळवेकर यांच्या ताब्यात असलेला वाडा पेशवेकालीन असल्याचे सांगितले जाते. त्याची रचना वेगळीच आहे. ज्या इमारती सदनिका पद्धतीने बांधलेल्या आहेत, तेथेही वाड्यासारखीच रचना म्हणजे मोठ्या खोल्यांमध्ये छोटी छोटी कम्पार्टमेंट धंद्यासाठी बनविलेली आहेत. म्हणजेच एका फ्लॅटमध्ये धंद्यासाठी तीन ते चार घरे असू शकतात. शौचालय आणि बाथरूम एका

फ्लॅटसाठी एकच असल्याचे आढळते. काही श्रीमंत घरवाल्यांनी मात्र स्वतंत्र शौचालय आणि बाथरूम बांधून घेतलेली आहेत. पूर्ण वस्तीमध्ये सकाळी एकदाच पाणी येते. धंद्याच्या घरांमध्ये पाणी साठविण्यासाठी सर्रासपणे प्लास्टिकच्या टाक्या बसविलेल्या दिसतात. त्याचबरोबर पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या, प्लास्टिकच्या पिशव्या तसेच कंटेनर विकत घेतले जातात.

हा ट्रेंड गेल्या पाच-सात वर्षांत आल्याचे दिसून येते. जुने वाडे किंवा अगदी चिकटून असलेल्या दोन इमारतींच्या मध्ये खूप घाण व कचरा सर्रास आढळतो. पूर्ण वस्तीमध्ये केवळ दोन सार्वजनिक स्वच्छतागृहे आहेत. एक सिटी पोस्टच्या मागे गुजराती शाळेजवळ आणि दुसरे ढमढेरे गल्लीत. वस्तीत खूप वर्षांपासून राहणाऱ्या महिला दगडूशेठ गणपतीजवळ असलेल्या हौदावरती कपडे धुवायला घेऊन जातात. वस्तीमध्ये कचरा गोळा करण्यासाठी धंदा सोडलेल्या वयस्क महिला किंवा तिथे कायमचे राहणारे वयस्क आणि दारुडे पुरुष यांना घरवाल्या दरमहा पैसे देऊन कामाला ठेवतात.

इथल्या महिला शहराच्या इतर भागात रहायला जाण्याचे प्रमाण गेल्या आठ-दहा वर्षांत खूपच वाढल्याचे दिसून येते. त्या एकमेकींची मदत घेऊन जागा मालकाची ओळख करून घेऊन खोल्या भाड्याने घेतात.

कोविडमुळे मात्र ही परिस्थिती थोडी बदललेली दिसते. वेश्या वस्ती सोडून शहराच्या इतर भागात जिथे त्या राहतात, तिथे घरमालक भाडे भरले नाही, तर त्यांना खोली सोडायला भाग पाडताना दिसतात. परिणामी अनेक महिला पुन्हा वस्तीमध्ये येऊ लागलेल्या आहेत. इथे घरमालकिणीशी बोलून जागा आणि काम नक्की मिळू शकते, त्यामुळे अनेक महिला पुन्हा वस्तीत येत आहेत आणि भाड्याने खोल्या घेऊन किंवा पुन्हा घरवालीच्या ताब्यात अर्धेलीने राहू लागलेल्या आहेत.



या बदलाशी जुळवत इथे धंदा करणाऱ्या, राहणाऱ्या महिलांच्या नजरेतून हे बदल कसे दिसतात, त्याची ही एक झलक आहे.

बुधवार पेठेत जुन्या पद्धतीचे वाडे आहेत. त्यातील बहुतेक वाडे आता १०० वर्षे किंवा त्याहून अधिक जुने आहेत. काही वाड्यांच्या सर्वांत वरच्या मजल्यांची किंवा काही भागांची पडझड झाली आहे. महानगरपालिकेने अशा इमारती धोकादायक म्हणून जाहीर केल्या आहेत. उर्वरित भागात लोक राहतात. काही वाडे पाडून तिथे इमारती उभारल्या आहेत; पण हे प्रमाण फारसे नाही. निमूळत्या इमारती, मधेच पडके वाडे, असे संमिश्र बांधकाम आहे.

बुधवार पेठेत सगळी जुनी घरे आहेत. जुन्या प्रकारची शौचालये आहेत. भंगी बोळ वर्षानुवर्षे साफ केला जात नसायचा. मी महापौरपदावर असताना या कामाला प्राधान्य दिले. ते साफ करायला गाढवाची गाडी लागत असे. तिचे टेंडर प्रथमच महानगरपालिकेत निघाले. मग बोळ साफ झाल्यावर पुणे मनपाने शौचालय दुरुस्तीचे कामदेखील केल्याचे सुरतवाल यांनी सांगितले.

इथे २००रुपये पर स्क्वेअर फूटप्रमाणे भाडं असेल. पागडी पद्धत आता बंद झाली आहे. १९५० पासून भाडे नियंत्रण कायदा तसाच राहिला. जागा स्वच्छ राहावी म्हणून पूर्वी जागा भाड्याने दिली जायची. भाडे वाढविले जात नसे. पागडी दिली, तर ती जागा मालकाची असायची. नंतर इतर भाडेकरूंच्या नावावर पावती केली, तर थोडं भाडं वाढण्याची शक्यता असायची.

महिलांचे प्रमाण वाढले; पण वस्ती वाढली नाही. पाच महिलांच्या ठिकाणी आता 25 महिला झाल्या. तृतीयपंथियांची संख्यादेखील वाढली.

ही जागा सुरक्षित आहे. सर्व एकत्र राहात होत्या. अगोदर झोपड्या, मातीची घरं होती. आता तिथे इमारती झाल्या आहेत. त्यांची जीवनशैली सुधारली आहे. राहणीमानही सुधारलंय. शुल्क वाढल्यामुळे त्यांना चांगलं राहता येतं. काही घरं खूप सुंदर आहेत. आपणही अशा घरात राहात नाही. नवीन बिल्डिंग, दो बदन, कोहिनूर अशा नावांनी काही इमारती आहेत. १० माणसं राहू शकतात, अशा ठिकाणी ६० महिला राहतात. अनेक इमारती अशा अवस्थेत आहेत की, त्यांना भोगवटा प्रमाणपत्र मिळू शकत नाही.

पूर्वी इथून मेट्रो जाणार होती. आता ही लाईन आमच्या इमारतीखालून जाणार नाही. या जागेवर आम्ही मॉल उभारणार आहोत. आता आम्हाला पार्किंगला जास्त जागा ठेवता येईल. मेट्रोमुळे चार एफएसआय मिळणार म्हटले तरी त्यांच्या अटी अशा आहेत की आवश्यक तेवढा एफएसआय मिळणं कठीण आहे. १०० मीटर रस्ता असेल, तरच चार एफएसआय मिळणार नाही. त्याला खूपच शुल्क आकारले आहेत. मग बिल्डर विकणार किती आणि शुल्क देणार किती? देताना दिलंय गोड, त्यात साखर इतकी दिली तर माणूस डायबेटीसने मरेल! ते नुसते गाजर आहे, असे प्रभाकर मोगल यांचे म्हणणे आहे.

ते म्हणाले, मेट्रोमुळे महिलांच्या धंद्यावर फार परिणाम होणार नाही. या वस्तीमुळे इथले रहिवासी कमी असतील. इथल्या जागेची किंमत कमी होत नाही; पण वाढतही नाही आहे. नवीन इमारतींमधील खर्च आणि पालिकेचा व्यापारी कर खूपच आहेत. ऑनलाईन खरेदीमुळे सगळ्याच वस्तूंवरील प्रॉफिट मार्जिन कमी झालेलं आहे.

स्वत: खोली घेऊन काम करायला सुरुवात केली. खोलीचे भाडे कुठे १० हजार,५ हजार, तर कुठे ७-८ हजार रुपये असते. ते मला नाही परवडू शकत. खर्चपण करू



शकत नाही, म्हणून मी घरवालीबरोबर अर्धेलीने राहतेय, तरी माझे अनेक खर्च भागवायचे राहिले आहेत, असे सोनीने सांगितले.

ती म्हणाली, घरवालीला पाण्याचे महिन्याला पाचशे रुपये द्यावे लागतात. मरगी गल्लीतल्या एका छोट्या खोलीचं भाडं १० हजार आहे. एक कॉट आणि त्याच्या शेजारी उभा राहता येईल एवढीच जागा. भोई गल्लीत एका घरात ७ हजार रुपये भाडं आणि ५०० रुपये लाईट बिलाचे देत होते. तिथे पाण्याचे पैसे द्यायला लागायचे नाहीत.



ज्या घरात दहाजण राहू शकतात, तेथे १०० माणसं राहिली तर कोणत्याही सुविधांवर ताण येणारच! उदाहरणादाखल सांगायचे झाले, तर एका गल्लीत सकाळी १०-१२ ट्रक कचरा साचलेला असतो. ९० टक्के हॉटेलमधले उरलेले जेवण तसेच कचरा खूप वाढला आहे.





# महिला आणि पोलिस

धंद्यासाठी कमी वयाच्या मुली असतील, या संशयाने भोई गल्लीत खूपच धाडी पडतात. पोलिसांना खूपच फायदा आहे. त्यांना सरकारचा पगार मिळतो. ते मोबाईल आणि पासपोर्ट काढून घेतात. पावती फाडतात. एक-दोन मुलींना पकडलं तर त्यांना सोडण्यासाठी तब्बल १०-२० हजार रुपये घेतले जातात. एकेकजण मोठमोठ्या गाड्या घेतात.

रितसर लग्न करतात आणि सेक्स वर्करवर प्रेमही करतात. कोणी घरखर्च भागविण्यासाठी हवालदार ठेवतात. (सेक्स वर्करचा पार्टनर हवालदार). कोणी साहेब बुधवार पेठेतल्या महिलेच्या मुलाचे बाप होतात. शुक्रवार पेठेतले पोलिस खूप चांगले आहेत काय?

आपल्या पत्नीला सोडून ते इथे येतात. दिवस-रात्र ड्युटी करतात. त्यांचं मनात इच्छा होत असेलच की? एकेकजण लपून- छपून दुकानवाला, पान टपरीवाल्यांना पटवतात. गिऱ्हाईकासाठी ३००० रुपयांची पावती फाडतात. वर आणि सांगतात, रस्त्यावर थांबायचं नाही, अशी साहेबांची ऑर्डर आहे म्हणून. आता बुधवार पेठेत पती असलेल्या महिला जास्त आहेत. संसारी लोकांचे प्रमाण वाढले आहे.

गेल्या ४-५ वर्षांत पोलिस खूपच त्रास देऊ लागले आहेत. सारख्या पावत्या फाडतात. इथं तीन हजार महिला आहेत; पण ते कुणालाही बाहेर उभं राहून देत नाहीत.



नवीन महिलांव्यतिरिक्त ज्या महिला जुन्या आहेत आणि ज्यांच्याकडे पुरावे आहेत त्यांना सोडून दिलं जातं. असा दुजाभाव केल्यावर लेकरंबाळं काय खातील? शुक्रवार पेठ आणि मंडईतले पोलिस खूपच वाईट आहेत. ज्या पोलिसांची इथे ड्युटी नाही, तेही इथे येऊन धाक दाखवून जातात. आसपास सगळेच लाच घेणारे आहेत. पूर्वीचे पोलिस आम्हाला त्यांचा आपला जेवणाचा डबा द्यायचे.



कधी कधी आमचा धंदा झाला नाही, तर हॉटेलमधून जेवण मागवून आम्हाला द्यायचे. वाढदिवसाला केकपण द्यायचे. एक मॅडम तर खूपच चांगल्या स्वभावाच्या होत्या. त्या बदली होऊन सीआयडीत गेल्या.जे दिवस-रात्र राऊंड मारायला येतात, ते खूपच मारतात. मग गिऱ्हाईक येणार कसे? जेव्हा भांडणं होतात तेव्हा ते येत नाहीत. भांडण संपल्यावर विचारतात काय झालं म्हणून? मदत हवी असते तेव्हा पोलिस येत नाहीत. तेव्हा म्हणतात की, १०० नंबरला फोन करा आणि खटला भरा. घरवालीचं म्हणणं ऐकतात; पण भाडेकरूचं काहीही ऐकत नाहीत. त्यांच्यावर अन्याय करतात.

मीरा बोरवणकर पुण्याच्या पोलिस आयुक्त होत्या, तेव्हा महिलांचा डेटा गोळा केला जात आहे. देखरेख ठेवण्याच्या बहाण्याने ते सरळ व्हिडिओ कॅमेरे घेऊन जायचे. रेड टाकताना डॉक्युमेंट करण्याच्या बहाण्याने रेकॉर्डिंग करायचे ते अजूनही चालू आहे, म्हणून अनेक महिला बुधवार पेठ सोडून गेल्या. इन्स्पेक्टर बर्गे यांनीपण हे केलं. नाकाबंदी, रात्री दहानंतर धंदा बंद, यामुळेही मुलींचं प्रमाण कमी झालं. या परिसरातून बायका निघून गेल्याचे तेजस्वी सेवेकरी यांनी सांगितले.

महिला आपले प्रश्न घेऊन माझ्याकडे यायच्या. मीही मदत करायचो. 99 टक्के प्रश्न पोलिस आणि गुंडांशी संबंधित असायचे, असा शांतिलाल सुरतवाल यांचा अनुभव आहे. पोलिस अधिकारी कारखानीस यांचे चांगले सहकार्य मिळाले. देवदासी महिलांकडून हप्ते घ्यायचे नाहीत, अशी ताकीद त्यांनी सगळ्या पोलिसांना दिलेली होती. सेक्स वर्कर्सना कोणतीही समस्या भेडसावली तर त्या मला सांगा, असे त्यांनी सगळ्यांना सांगितले होते. त्यामुळे पोलिसांकडून महिलांना त्रास व्हायचा नाही. काहीवेळा महिलांना सॉलिसिटिंगच्या कलमाखाली अटक व्हायची. या कलमाखाली अटक करतानाही साक्षीदार असावे लागतात. महिलांना कायद्याची एवढी माहिती नव्हती. कोर्टासमोर त्या आरोप मान्य करायच्या. मी त्यांना हा आरोप

अमान्य करायला शिकविले. त्यांच्या बाजूने वकील दिले; पण कोर्टासमोर पोलिसांच्या विरोधात जायची हिंमत सगळ्यांजणींमध्ये नसते.

### भानुप्रताप बर्गे यांच्या म्हणण्यानुसार

भानुप्रताप बर्गे यांनी २०११ ते २०१४ या काळात फरासखाना पोलिस ठाण्यात वरिष्ठ पोलिस निरीक्षक म्हणून काम केलं आहे. त्यावेळी २०११ ते १३ या कालावधीत सामाजिक सुरक्षा विभागाचे इनचार्ज म्हणून काम केलं. त्या काळात मी बहुतांश केसेस हाताळल्या. त्या काळात मी एक थंब रूल केला होता. ज्या एनजीओ मोठ्या प्रमाणात धाडी टाकायच्या, त्यातल्या बऱ्याचशा धाडी बनावट आहेत, असं आम्हाला आढळून आलं. मोठ्या महिलांचं वय कमी दाखवून त्यांची सुटका करण्याचा प्रयत्न करीत होत्या. मीरा बोरवणकर या त्या काळात पुण्याच्या पोलिस आयुक्त होत्या. त्यांनी बुधवार पेठेतल्या सर्व संस्थांची दर तीन महिन्याने मीटिंग बोलवायला सुरुवात केली. त्यामुळे आमचा संस्थांबरोबर संवाद वाढला. त्यामुळे ज्या खोट्या धाडी होत्या किंवा मोठ्या धाडी होत्या त्या कमी झाल्या. यामध्ये महिलांचे केस धरून ओढत घेऊन जायचे, त्यांच्यावर अत्याचार व्हायचे त्या धाडी आम्ही बंद केल्या. साहजिकच त्यामुळे महिलांना होणारा त्रास कमी झाला. खात्रीलायक माहिती आणि आमचा डीकॉय कस्टमर पाठवून माहितीची खात्री केल्याशिवाय आम्ही धाड टाकायला परवानगी दिली नाही. केवळ एनजीओ आहे म्हणून किंवा कोणी माहिती दिली म्हणून माझ्या काळात धाडी पडल्या नाहीत. या काळात वंचित विकास, प्रकाश यादव आणि बी पन्ना यांच्याशी आमचे चांगले संबंध निर्माण झाले. पोलिस तुम्हाला त्रास देणार नाहीत. कोणी त्रास दिलाच तर मला प्रत्यक्ष येऊन भेटायचं, असं मी त्यांना सांगून ठेवलं होतं. हा संदेश सगळीकडे पसरला, त्यामुळे पोलिसांकडून होणारा त्रास किंवा निर्माण केल्या जाणाऱ्याअडचणी थांबल्या. त्यांच्या घरी गेल्यावर त्यांना खूप पैसे मिळतात असं



वाटायचं नाही; पण त्यांना आपण यातून बाहेर पडू शकतो असंही वाटायचं नाही. बाहेर पडण्याचा आत्मविश्वास नव्हता आणि दुसरी गोष्ट म्हणजे इझी मनी. मोलकरीण म्हणून महिनाभर काम केल्यावर सहा-सात हजार रुपये हातात पडतात आणि तेच इथे दोन-चार गिऱ्हाईक केल्यावर घरवालीचे पैसे भागवून दिवसाला हजार रुपये तरी मिळतात.

घरमालक, कुंटणखाने चालविणारे आणि महिला यांची नावं, त्यांच्याकडे असलेली कागदपत्रं या सर्वांचं रजिस्टर पोलिसांनी बनविलेलं आहे. ते फरासखानामध्ये उपलब्ध आहे. २००० महिलांची नावनोंदणी करण्यात आली असून, हे काम अजूनही सुरू असेल. याच काळात आम्ही सर्वांत जास्त  अल्पवयीन मुलींची सुटकापण केली. आम्ही २२ ब्रोथेल्स बंद केले. या सर्व केसीस उच्च न्यायालयापर्यंत गेल्या आणि सगळ्या केसीसमध्ये कोर्टाने पोलिसांच्या बाजूने निर्णय दिले. पोलिसांनी योग्य तीच कारवाई केल्याचं कोर्टाने सांगितलं. पिटा ॲक्टच्या कलम १७ नुसार अल्पवयीन मुली आणि जबरदस्तीने धंदा करविणाऱ्यांविरुद्ध सील करण्याची कारवाई केली होती.

पूर्वी पुणे एक छोटं शहर होतं. आता ही मेट्रोपोलिटीन सिटी झाली आहे. तेव्हा पुण्यात वेश्या व्यवसाय केवळ बुधवार पेठेतच चालायचा; पण आजची परिस्थिती पाहिली, तर असे लक्षात येईल की, बुधवार पेठव्यतिरिक्त केलेल्या केसीस पाहिल्या असता आता महिला लॉजमध्ये जातात. मसाज सेंटरच्या नावाखाली चालणारा वेश्या व्यवसाय आहे. घरकाम करणाऱ्या मोलकरणीसुद्धा यात आलेल्या दिसतात. पूर्वी धंदा करणाऱ्या महिला बुधवार पेठेतच राहायच्या. आता त्या कात्रज, इंदिरानगर, बालाजीनगर इथे राहताना दिसतात आणि व्यवसायासाठी बुधवार पेठेत येतात.

पूर्वी बुधवार पेठेची ओळख नॉन महाराष्ट्रीयन होती. आता परिस्थिती तशी राहिलेली नाही. पूर्वी मर्यादित असलेला हा व्यवसाय संपूर्ण शहरात फैलावलेला आहे. आता फक्त बुधवार पेठच नाही, तर अन्य ठिकाणीही कारवाई केली पाहिजे. पूर्वी बुधवार पेठ १० होती, ती २-३ राहिली आहे. आता त्याचं भौगोलिक महत्त्व राहिलेले नाही. जवळच्या गावातून खरेदीसाठी किंवा सेक्स वर्कसाठी पुण्यात येण्याची गरज पडत नाही. त्यांच्या गरजा स्थानिक पातळीवर भागविल्या जातात. आज बुधवार पेठेतला ग्राहक हा सर्वांत खालच्या स्तरातला गरीब आहे.

## ● सक्तीची सुटका

### ► महिला व संस्थांची बाजू



आंध्र प्रदेशातल्या अनंतपूरमधून जास्त महिला इथे आलेल्या आहेत. आंध्र आणि पुणे पोलिसांनी गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर रेस्क्यू ऑपरेशन्स केली. त्यामध्ये महिलांना अक्षरश: ट्रॅक केलं गेलं, त्यामुळे त्यांचं बुधवार पेठेत येण्याचं प्रमाण खूपच कमी झालं आहे. त्यावेळी मोठ्या आणि हिंसक धाडी पडल्या होत्या. महिलांना गाडीत कोंबून नेलं जायचं. एका कारवाईत महिलेचा मृत्यू झाला होता. २००८-९ च्या आसपासची घटना असेल ही. त्यानंतर ही संख्या कमी झाली. डिस्को इमारतीची एक बाजू बंद असल्यासारखीच आहे. २००५ ते २०११ या काळात पोलिसांनी एकूण ८६ धाडी टाकल्या होत्या, त्यांपैकी फेब्रुवारी २०१० ते जानेवारी २०११ या काळात नऊ धाडी टाकण्यात आल्या होत्या.



व्यक्तिनिहाय ट्रेंड बदलतात. पुनर्वसनाचा अजेंडा असणाऱ्या संस्था आणि त्यांना साथ देणारे पोलिस अधिकारी असले की, धाडींचा जोर वाढतो असे दिसले. धाडी का टाकता, असे आम्ही विचारले की स्थानिक पोलिस आम्हाला सांगायचे की, या संस्था वरच्या पातळीवरून धाडीचे आदेश आणतात. २०१०-११ नंतर धाडींचे प्रमाण वाढले. पूर्वी २००६ नंतर फ्रीडम फर्म सक्रिय होती; पण महिलांचा त्यांना विरोध होता. ते डिकॉय कस्टमर पाठवायचे; पण महिला सतर्क होत्या. त्याला विरोध केल्यामुळे ही संस्था बाहेर पडली. आताच्या काळात फ्रीडम फर्म, रेस्क्यू फाऊंडेशन सक्रिय नाहीत; पण पुनर्वसनाचा अजेंडा राबविणाऱ्यासंस्था वाढताहेत.

नवीन महिलांना, पोलिसांना माहिती देणाऱ्या महिलांना डांबून ठेवले जाते. मला पोलिसांनी पकडलं होतं. शंभर - पन्नास दिल्यावर सोडलं आणि मुंबईला पाठविलं. तिथेही नेपाळी घरवाली होती. तिथे तर संपूर्ण टोळीलाच पकडलं. तिथे माझं मेडिकल चेकअप झालं. त्यावेळी माझं वय अठराच्या दरम्यान होतं. नंतर चेंबूरमधल्या देवनार आश्रममध्ये मला ठेवण्यात आलं. मी मात्र तिथल्या लोकांच्या डोळ्यांत मिरची पूड टाकून पळून आले. पोलिस आले तर मी माझ्या मर्जीने धंद्यात आले असल्याचं सांगायचं, असं आम्हाला सांगून ठेवलं होतं. पोलिस आल्यावर आम्हाला चिमटे काढायचे, जी ओरडेल ती नवीन आहे. जी ओरडणार नाही ती नवीन नाही अशीही जागरूकता केली.

## ● पोलिसांची बाजू

अल्पवयीन मुली आणि जबरदस्तीने धंद्याला लावण्याला, गिऱ्हाईकाला लुटण्याला आमचा झिरो टॉलरन्स होता. एका बाजूने महिलांचा विश्वास संपादन करून कायदेशीर कारवाईसुद्धा केली. बुधवार पेठ परिसर मला अनोळखी नव्हता.

माझ्या कॉलेज जीवनापासून हा काय भाग आहे, याची मला कल्पना होती. परंतु, धाडी टाकताना महिलांची वस्तुस्थिती दिसली. ज्या महिलांना आणून विकलं जातं आणि जबरदस्तीने धंद्याला लावलं जातं, त्यांची नेमकी परिस्थिती कळली.

बांगलादेश, बंगालमधल्या महिलांना परत पाठविताना आपण तिकडच्या पोलिसांनाही सहभागी करून घ्यायचो किंवा इथले पोलिस त्यांना सोडायला जायचे. त्या महिलेला सोडायला जाताना गावच्या सरपंचाला बोलवलं जायचं. ती मुलगी सर्वकाही सांगायची, त्यामुळे तिला गावात राहणं मुश्कील व्हायचं म्हणून इथे पोलिसांऐवजी आम्ही एनजीओंची मदत घेतली. त्यात आम्हाला रेस्क्यू फाऊंडेशनने खूप मदत केली. इथून कोलकत्ता किंवा बांगलादेशला पोहोचेपर्यंत प्रवासात पोलिसांचं संरक्षण देण्यात आलं; पण गावात नेण्यासाठी त्यांना संस्थेच्या हवाली केलं. यासाठी लागणारी सगळी कागदपत्रं कोर्टाची रीतसर परवानगी घेऊन तयार केली. महिला एनजीओच्या हवाली केल्यामुळे या महिला बुधवार पेठमधून आल्या आहेत, हे आई-वडिलांशिवाय कुणालाच कळायचं नाही. त्यामुळे या महिला परत व्यवस्थित स्थिरस्थावर झाल्या. त्यातही ज्या महिलांना सोडवू शकलो, त्याबद्दल विशेष आनंद आहे. कारण मुलगी इथे आल्यापासून तिला व्यवसाय सुरू करायला लागेपर्यंत आठ-पंधरा दिवस लागतात. त्याच्याबद्दलची माहिती त्यांच्यातल्याच वयस्क महिलांकडून किंवा एजंटकडून कळायची. १० ते १५ वर्षांची मुलगी आली आहे असं सांगितलं जायचं, त्यामुळे त्या सेक्स वर्कला एक्स्पोज होण्यापूर्वी त्यांची सुटका केल्याचा आनंद जास्त वाटायचा. आझाद हिंद एक्स्प्रेसवर आम्ही अचानक धाडी घालायचो. तिथे बांगला भाषा बोलणार्या महिलांना बरोबर घेऊन जायचो, त्या मुलींशी बोलल्यानंतर त्यांना जबरदस्तीनं इथं आणलंय का हे कळायचं. अशीही मुलींची सुटका केली आहे. या तीन वर्षांच्या काळात ३०० मुलींची सुटका केली. त्यांपैकी १५० पिटा कायद्यानुसार केसेस केल्या. असे एसीपी भानुप्रताप बर्गे ह्यांनीसांगितले.



# संघटन आणि संस्थांची भूमिका

१९९० च्या आधी कोणतीच संस्था इथं नव्हती. कंडोम वगैरे माहिती नव्हतं, असं लतानं सांगितलं. दिवस गेले तर कालेकर डॉक्टरांकडे जाऊन पाडून घ्यायचो. आणखी एक डॉक्टर प्रसिद्ध होते उपचारासाठी. गिऱ्हाईक जेव्हा जोरात संबंध करायचे, तेव्हा महिलांना त्रास व्हायचा. त्यावर आणि गुप्तरोगाच्या संसर्गावर संबंधित डॉक्टर उपचार करायचे. (बॉम्बे विहार हॉटेलजवळ आता त्यांचा मुलगा दवाखाना चालवितो.)

पूर्वी सर्रासपणे गर्भ पाडले जायचे. आता मात्र डॉक्टर गर्भपात करायला घाबरतात. नंतर गिऱ्हाईकाला १२ रुपये रेट झाला, तेव्हापासून संस्थांचं काम सुरू झालं. सीमा म्हणाली, मी सहेली संस्थेत आले. इथं काम सुरू केलं. सुरुवातीला तीनशे रुपये पगार होता. सहेली संस्था सुरू झाल्यानंतर मानव्य, देवदारी, कायाकल्प, जॉन पॉल वगैरे संस्थाही आल्या. पगार हजार-पंधराशेप्रमाणे वाढत गेला. आता चार हजार रुपये मिळतात.

संस्थेत काम करताना मी कोलकत्ता, कोकण, गया, सांगली, मिरज, निपाणी, बेळगाव अशा खूप ठिकाणी गेले. नवनवी माहिती मिळाली. गाडीखाना आणि ससून हॉस्पिटलच्या मोठमोठ्या डॉक्टरांनी आम्हाला शिकवलं. पूजा यादवसोबत मी दहा वर्षे काम केलं. त्यांनीच मला सही करायला शिकवलं.



ती पुढे म्हणाली की, आम्ही सांगतो त्याप्रमाणे आता महिला कंडोम वापरतात. गुप्तरोग आणि इतर गोष्टींबद्दल ऐकून घेतात. कंडोम फाटला तर लगेच डॉक्टरांकडे जा, असं आम्ही त्यांना समजावून सांगतो. लिंग पाहूनच गिऱ्हाईक घ्यायला पाहिजे, असं त्या म्हणतात.

सोनीने सांगितलं की, पार्टनर चांगली साथ देईल म्हणून लग्न केलं. मूल जन्मल्यानंतर एका महिन्यातच तो मुलाला सोडून गेला.



त्या मुलाच्या हृदयाला तीन भोकं आहेत. संस्थेच्या लोकांनी मला मदत केली. संस्थावाल्यांना मला मदत करायला सांगितली. मला आधार कार्ड, पॅन कार्ड बनवून दिलं. लाईट बिल पण माझ्या नावावर नव्हतं. संस्थेने मदत केली. मरगी गल्लीत राहूनच हे सर्व केलं. संस्थावाले हाच माझा परिवार आहे, असा मी म्हणते. माझं कुटुंब नाही. मी कुठेही गेले तरी यांचंच नाव घेते. एकत्रिकरण करताना वेगवेगळ्या राज्यांप्रमाणे अडचणी येतात. प्रत्येकाच्या पद्धती वेगळ्या आहेत. त्यांचं प्रतिनिधित्व करणारी कोणी पीअर एज्युकेटर नसेल, तर त्यांच्यापर्यंत पोहोचताना अडचणी येतात. संघटन म्हटले तर आपली जेवढी कानडी आणि नेपाळी महिलांशी नाळ जोडलेली आहे, तशी बंगाली महिलांशी जोडली गेली नाही. त्या मीटिंग, कार्यक्रमाला येतील, जिथे एकत्र येऊन काही करायचं असेल, पोलिसांशी बोलायचं असेल तर तिथे त्या येणार नाहीत.

जेवढ्या महिला असहाय्य तितक्या पुढे यायला घाबरतात आणि त्यांना भाषेचीही अडचण असते. नवीन महिलांना हिंदी येत नाही. नंतर शिकतात त्या. कम्युनिटी व्हॉलेंटियरच्या मदतीने त्यांच्याशी संवाद साधता येतो; पण त्यांचे आपापसातही खूप वाद आहेत.कानडी, मराठी महिला त्यांना खूप शिव्या घालतात. त्या गिऱ्हाईकाकडून पैसेपण कमी घेतात आणि चोऱ्यापण करतात. गिऱ्हाईकांचे पैसे आणि मोबाईल काढून घेतात. त्यामुळे त्यांचे आपसातले संबंध फारसे बरे नाहीत. हा व्यवसाय तर फार पूर्वीपासून आहे. हा व्यवसाय ना कायदेशीर आहे ना बेकायदेशीर. या पार्श्वभूमीवर ज्या महिलांना या व्यवसायातून बाहेर पडण्यासाठी संस्थांच्या, महापालिकेच्या मदतीने प्रयत्न करण्यात आले. त्यात बाहेर पडलेल्या महिला पुन्हा व्यवसायात आल्या आणि आम्हाला हेच काम करायचं आहे असं त्यांनी सांगितलं. महिला सहाय्य कक्षाच्या माध्यमातून त्यांच्यासाठी शिवणकाम, ब्युटीपार्लरचे कोर्स चालवले. या प्रशिक्षणानंतर त्यांनी स्वत:चं ब्युटीपार्लर सुरू

केलं. तिथे काही दिवसांनी हे ब्युटीपार्लर सुरू करण्यापूर्वी ती बुधवार पेठमध्ये होती हे कळायचं, तर समाजानं त्यांना नाकारलं. त्याचा आकडा सांगता येणार नाही. यात रेस्क्यू फाऊंडेशनपण सामील होतं. सुटका केलेल्या महिलांना आम्ही त्यांच्याकडे पाठवायचो. मग ते त्यांना शिवणकाम शिकवायचे. २०११-१२ मध्ये असे प्रयत्न केले. तिथेच त्यांच्या मित्र-मैत्रिणी होतात. मुलंही होतात. या मुलांसाठी विलास चाफेकरांच्या मदतीने आपण काम केलंय. ढमढेरे बोळात पन्नाबरोबर सकाळी काही लोकांना जेवण देण्याचं काम सुरू केलं. ते आजही चालू आहे. सामाजिक संस्थांना बरोबर घेऊन काम केलं. पोलिस म्हणून कायद्याची कामं करतच होतो. तेव्हा माणूस म्हणूनपण संस्थांच्या माध्यमातून या महिलांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. २००० नंतर संस्थांची संख्याही खूप वाढली.

रामेश्वर मार्केटमध्ये जवळजवळ सर्व संस्थांची कार्यालय आहेत. नवीन लाईट हाऊस नावाची संस्था सुरू झाली आहे. आता त्याला लोक 'एनजीओ बिल्डिंग' असं म्हणू लागले आहेत. समपथिक, उडान, कायाकल्प, जॉन पॉल स्लम डेव्हलपमेंट आणि आता हे लाईट हाऊस या सगळ्या संस्था तिथेच आहेत.

महिलांसाठी ती पांढरी बिल्डिंग आहे. त्यांना कोणती संस्था काय काम करते हे कळत नाही. तिथलं कोणीतरी त्यांना सांगतं 'रक्त दिलं (एचआयव्ही चाचणीसाठी), तर आम्ही तुम्हाला कंडोम देऊ. असं ऐकल्यावर त्या महिला वैतागतात. 'सहेली'ने कूपन देऊन रेशन द्यायला सुरुवात केली. मग इतरांनाही तेच केलं आता कोणतं कुपन घेऊन कोणत्या संस्थेत जायचं हेही महिलांना कळत नाही.

———•••———



# एचआयव्ही ते कोविड-19 लढाई निकराची

१९९० पूर्वी कंडोमचा वापर केला जात नव्हता.  जानजागृती करणाऱ्या त्यावेळी संस्थाही नव्हत्या. प्रत्येक संबंधावेळी कंडोम वापरावेत, असा प्रचार आम्ही केला. महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या सहाय्याने कंडोम वितरण करण्यास सुरू केले; पण आमच्याकडे निधी कमी होता.

मग आरोग्य अधिकारी अनिल रावेतकर आणि मी केंद्र सरकारला कंडोमबाबत पत्र लिहिले. कंडोमचे अधिकृत वाटप केंद्र म्हणून माझ्या दुकानाची नोंदणी करून घेतली आणि संबंधित महिलांना संरक्षणासाठी कंडोमचे वितरण सुरू केले. पानपट्टीवाल्याकडेही आम्ही कंडोम ठेवायचो. 'इथे कंडोम उपलब्ध आहेत,' असे बोर्डच त्यांना लावायला लावले. त्यावेळी महिलांना मोफत स्वरूपात कंडोम दिले जायचे. त्यानंतर घरवाल्यांनाही कंडोमचा स्टॉक ठेवायला लावले. असे शांतीलाल सूरतवाला ह्यांनी सांगितले.

एचआयव्ही/एडस्बाबत जागृती नव्हती तेव्हाची गोष्ट. नारी संस्थेला एचआयव्ही, एसटीसी संशोधनासाठी रक्ताचे नमुने हवे होते; पण महिलांना भीती वाटत होती. रक्त द्यायला कोणीही तयार नव्हते. मग आम्ही त्यांच्याशी चर्चा करून समजावून सांगून त्यांच्यातील भीती दूर केली. त्याचा सकारात्मक परिणाम होऊन एका दिवसात तब्बल १२०० रक्ताचे नमुने जमा झाले. आमच्यावर असलेल्या दृढ विश्वासामुळेच त्या रक्त द्यायला तयार झाल्या, सुरतवाला यांनी सांगितले.

डॉ. घिया यांनी सांगितले की, एचआयव्हीच्या सुरुवातीला अर्ली डिटेक्शनसाठी घरून नमुने गोळा करण्याचं काम केलं; पण कोणत्या संस्थेशी जोडला गेलो नाही.

कोविड १९: कोविड काळात पोलिसांपेक्षा तरुण मंडळेच जास्त प्रमाणावर नियंत्रणाचे काम करीत असल्याचा महिलांचा अनुभव आहे. पोलिसांचा मात्र खूप चांगला अनुभव आला. त्यांनी रेशन वाटायला मदत केली. कोणी आजारी असेल तर तिच्यासाठी ॲम्ब्युलन्स मागवून संबंधित महिलेला त्या गाडीत पोलिसांनी स्वतः बसविले आहे. मंडळातल्या पोरांनी मदत केली; पण त्रासही दिला. एकही गिऱ्हाईक दिसता कामा नये, अशी त्यांची दादागिरी दिसते. पोलिसांच्याही पलीकडे जाऊन ते नियंत्रण करत होते.



- **कोविडकाळात झालेले बदल :**

मदतरूपात धान्य / रेशन मिळाले, तरी अन्न शिजविण्यासाठीही खर्च येतोच. तो वाचविण्यासाठी या काळात 'कॉमन किचन सुरू केले.

कोवडमुळे धंदा जवळपास थांबलाच आहे. एप्रिल- मे महिन्यात कर्नाटक, कलकत्ता, आंध्रच्या खूपजणी घरी गेल्या होत्या; पण लॉकडाऊन शिथिल झाल्यावर त्या परत आल्या. इथे निदान खायला तरी मिळतं, ही त्यांची भावना आहे. त्यामुळे इथे काम आहे, खायला मिळेल असं त्यांना वाटतं.

डिसेंबर २०२० पर्यंत बुधवार पेठेतील पाचजणींचा कोविडमुळे मृत्यू झालाय. केसीस वाढत आहेत. महिलांवर मात्र त्यांची कोविड टेस्ट करण्याची सक्ती केली जाते; पण त्यांचे रिपोर्ट दिले जात नाहीत. रिपोर्ट हातात ठेवून त्यांच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला जात आहे, त्यामुळे त्यांच्या मनात कोविडची धास्ती आहे.

- **नवनव्या संस्था अन् त्यांचा नवनवा अजेंडा**

रेस्क्यू, पुनर्वसनाचा अजेंड छुप्या रूपाने घेऊन येणाऱ्या बऱ्याच संस्था आहेत. इथे सर्व महिलांचे टेस्टिंग आणि अलगीकरण कक्ष या दोन्ही सविधा उपलब्ध करूया असं काही संस्थांचं म्हणणं आहे. जो सर्वसामान्य नागरिकांना नियम असेल, तोच याही महिलांना लावला पाहिजे, असे म्हणून 'सहेली'ने विरोध केला. आता दुसरी अशी बातमी आलीय की, इथल्या बहुसंख्य महिलांना बुधवार पेठ अथवा व्यवसाय सोडायचा आहे, असं स्वतःहून सांगून त्या तेथून बाहेर पडल्याचं म्हटलंय.

## मरगीबाई नावाची आख्यायिका आणि इतर

**१.** फार कमीजणांना मरगीबाईबद्दल माहिती आहे. क्रांती हॉटेलच्या मागच्या गल्लीला मरगी नावाच्या महिलेवरून मरगी गल्ली असं नाव पडलं. त्या महिलेला एक खाट पुरायची नाही, एवढी ती अवाढव्य होती. तिचे मोठमोठे डोळे भयानक वाटायचे. तिला पाहून आम्ही पळून जायचो. लहान लहान मुली आणून ती धंद्याला लावायचा प्रयत्न करायची. एखादी धंद्याला नाही लागली, तर तिला कापून पाठीमागे असलेल्या विहिरीत टाकून द्यायची, असं एकायला मिळतंय. मुली आणल्या; पण पुढे त्यांचं काय झालं हे त्यावेळी कळायचं नाही. तिच्या घरातून बाहेर पडलेल्या मुलींनी शेजारी धंदा सुरू केला आणि मरगी गल्ली विकसित झाली. मरगीबाई खूप क्रूर होती. पोलिसांनाही ती सापडत नव्हती. मरगी महिलेबद्दल अनेक कथा ऐकायला मिळतात.

- डॉ. घिया

**२.** एक कानडी घरवाली होती. ती अत्यंत आक्रमक होती आणि बुधवार पेठेतल्या सर्व धंद्यावर तिची हुकुमत होती. तिचा पती सावकार होता. ती ज्या वाड्यात काम करायची, तो तिच्या पतीने बांधला होता. त्यात एक विहीर होती. श्रीमंत गिऱ्हाईकांना लुटून ती त्यांना मारून त्या विहिरीत टाकत असे, अशा कहाण्या सांगितल्या जातात. परंतु, ती महिलांना खूप मदत करायची. मुलींवर अत्याचार करणाऱ्यांना तिचा पती झोडपून काढत असे, म्हणून त्या गल्लीला मरगी गल्ली असं नाव पडलं.

- किसन मुळे



**३.** मरगी गल्लीचा इतिहास पार स्वातंत्र्यपूर्व काळात सुरू होतो. तेव्हा कर्नाटकातल्या अथणीच्या मंगसुळीमधला इराप्पा कांबळे नावाचा माणूस ब्रिटिश सरकारचा चाकर होता; पण नोकरीत जाच होतो म्हणून ती सोडून तो पुण्याला आला. त्यावेळी पुणे रेल्वे स्टेशनचे बांधकाम चालू होते. तिथे त्याला मजुरीचे काम मिळाले. १०४५, बुधवार पेठेत भाड्याने खोली घेऊन तो सहकुटुंब राहू लागला. इराप्पाला चार मुली होत्या. त्यातली सर्वांत मोठी मरगू. या मरगूनं घरच्या कमाईला हातभार लावण्यासाठी धंदा सुरू केला. तिची बहीण राणीही तिच्यासोबत हे काम करू लागली. १०४५, बुधवार पेठ ही त्यांची धंद्याची जागा होती. तिथेच ब्रोथेल सुरू करून त्यांनी कर्नाटकातून आणखी महिलांना आणले. मरगुबाईचे ब्रोथेल सुप्रसिद्ध होते. मोठमोठ्या लोकांची ये-जा होती. नंतर ती गुन्हेगारी कृत्यात अडकली. १९५१ मध्ये तिला तडीपार करण्यात आले. तिच्या पश्चात तिच्या नातेवाईकांनी धंदा सांभाळला.

- (प्रकाश यादव व मीरा बोरवणकर लिखित अहवाल)

## इतर प्रभावशाली महिला

मरगी गल्लीफेम मरगीबाईनंतर तिच्यासारखाच प्रभाव असलेल्या महिलांमध्ये मोडणारी नावे म्हणजे तानाबाई सागरे व त्यांची आई. त्यांचा अख्ख्या मरगी गल्लीवर वचक होता. तानाबाईंचा मुलगा दत्ता सागरे हा नंतर या भागात नगरसेवक म्हणून निवडूनही आला होता. मरगी गल्लीतल्या कमळाबाईचाही धंद्यावर प्रभाव होता, असं काही वयस्क महिला सांगतात. कमळाबाई यमुनाव्वा दासर आणखी भोई गल्लीतली एक प्रभावी घरवाली. खूप श्रीमंतही होती. कर्नाटकच्या धंदेवाल्या महिला तिच्या नियंत्रणामध्ये होत्या.

१९८० मध्ये शांता नेपाळीचा धंदा तेजीत होता. तिने खूप कमाई करून औंधमध्ये मोठा बंगला बांधला. त्यावेळी तीही माझी मतदार होती, असे सुरतवाला यांनी सांगितले. आणखी काही महिला प्रसिद्ध होत्या. सोनाबाई ही एक संस्थानिकच होती. चार घरं. सहा फुटी. रस्त्यावरून चालत जाताना दहा-बारा महिला मागे-पुढे असत. काका हलवाईजवळ असलेल्या गुजर कोल्ड्रिंक हाऊसच्या समोर तिची घरं होती. त्यांची पुढची पिढी इथे काम करीत नाही. त्यांच्या मुली धंद्याला येत नाहीत; पण घरात शिक्षणाचं वातावरण नसल्याने त्या खूप शिकत नाहीत, हे डॉ. घिया यांचं निरीक्षण आहे. कट्टमणी शांताबाईने आता मोठी इमारत घेतली आहे. ती आता मॅनेजर आहे. संस्थांची कार्यालये असलेल्या पूर्ण इमारतीची मालकीण रेवाबाई कांबळे होती.






## बुधवार पेठेतल्या सुविधा

**सरकारी दवाखाना** - डॉ. कोटणीस आरोग्य केंद्र, गाडीखाना

**संस्थांचे दवाखाने** - सहेली संघ, वंचित विकास, कायाकल्प

**खासगी डॉक्टर** - डॉ. घिया, डॉ. कालेकर, डॉ. कामत, डॉ. सूर्यवंशी, डॉ. जोशी, डॉ. मेहता, डॉ. पाटील, डॉ. चिल्लरकर

**शैक्षणिक सुविधा** - नूतन समर्थ विद्यालय, गुजराथी शाळा, सरस्वती विद्या मंदिर, एकलव्य, स्वाधार (शिशु वर्ग), सेवासदन, भारत मराठी विद्यालय, सुंदरबाई राठी विद्यालय.

**मुलांसाठी वसतिगृह** - एकलव्य, सर्व सेवा संघ, दगडूशेठ, मानव्य.

**पाळणाघर** - सहेली, कायाकल्प, स्वाधार, वंचित विकास (फुलवा), चैतन्य महिला मंडळ (रात्रीचे पाळणाघर)

**प्रार्थनास्थळं** - काळी जोगेश्वरी, शनी मंदिर, म्हसोबा, दत्त मंदिर, स्वामी मंदिर, दगडू शेठ मंदिर, विजय मारुती मंदिर, साईबाबा मंदिर, राम मंदिर (तुळशी बाग), स्वामी नारायण मंदिर (शुक्रवार पेठ), महादेव मंदिर, मीरा दातार दर्गा, तांबोळी मशीद, दुर्गामाता मंदिर, यलम्मा मंदिर

**पोलिस ठाणे** - शुक्रवार पेठ पोलीस चौकी, फरासखाना, मंडई चौकी

**सिटी पोस्ट** - मनीऑर्डर, पत्र, आधार कार्ड, राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र

**बँका** - बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडोदा, सुवर्णयुग सहकारी बँक, नाशिक मर्चंट बँक यांच्या शाखा

**लोकप्रिय खाद्याची ठिकाणं** - गुजर कोल्ड्रिंक, दुर्गा बिर्याणी, तिरंगा, यलम्मा हॉटेल, प्यासा हॉटेल, समाधान, गोडसे उपहारगृह, अर्चना हॉटेल, क्रांती, चेतक, जय भवानी, जनता, गीता विहार, वाघोलीकर रेवडीवाला, काका हलवाई, अगरवाल समोसा, गोपाल हॉटेल, भोले पानवाला

**दारूची दुकाने** - परदेशी वाईन्स, गंगा वाईन्स, हीना, माल्टा दारू दुकान (मरगी गल्ली), ताडी गुत्ता 2 वर्षांपूर्वी बंद. परिसरात एकूण सात दारूची दुकाने आहेत. देशी दारूची दोन दुकाने आहेत- मरगी गल्ली आणि ढमढेरे गल्ली

**सिनेमागृह** - श्रीनाथ, श्रीकृष्ण, विजयानंद, वसंत, रतन, प्रभात, आर्यन, मिनर्व्हा (फक्त प्रभात आणि वसंत थिएटर सध्या सुरू आहे.)

**मार्केट** - महात्मा फुले मंडई, रविवार पेठ, बोहरी आळी, नेहरू चौक, तुळशीबाग



## संदर्भ

१. सीमा (४२ वर्षे), नेपाळी सेक्स वर्कर, १९८३ मध्ये आसाममधून बुधवार पेठेत स्थलांतरित

२. लता (५२ वर्षे), स्वेच्छेने काम करणारी स्थानिक सेक्स वर्कर

३. पन्ना (५२ वर्षे), १९८० पासून बुधवार पेठेत राहायला, कामाला आलेली तृतीयपंथी, आशीर्वाद संस्थेची संस्थापक / लिडर

४. प्रभाकर मोगल (६८ वर्षे), १९५१ पासून स्थानिक रहिवासी, व्यापारी, जमीन/दुकान मालक

५. शांतिलाल सुरतवाला (७० वर्षे), १९७९, १९८५ व १९९२मध्ये नगरसेवक म्हणून बुधवार पेठेतून निवड, लोकप्रतिनिधी या नात्याने वस्तीत नागरी सुधारणा, पोलिस केस आणि अन्य प्रकारे महिलांना मदत

६. डॉ. वसंत घिया (७२ वर्षे), १९७० पासून बुधवार पेठेत डॉक्टरी व्यवसाय, सेक्स वर्कर रुग्णांवर उपचार व विश्वासाचे संबंध

७. किसन मुळे (९२ वर्षे), बुधवार पेठेतील जुने कापड व्यापारी

८. सोनी (३६ वर्षे), कलकत्याहून पुण्यात १८ व्या वर्षी स्थलांतरित सेक्स वर्कर

९. तेजस्वी सेवेकरी (४५ वर्षे), सहेली एडस् कार्यकर्ता संघ संस्थेची संस्थापक सचिव

१०. भानूप्रताप बर्गे (६२ वर्षे), माजी वरिष्ठ पोलिस निरीक्षक

११.अहवाल / पुस्तके पुण्यातील वेश्या व्यवसाय: सर्वेक्षण १९९८ - या डॉ. आशा आपटे लिखित पुस्तकातील माहिती

१२.अहवाल / पुस्तके पुण्यातील रेड लाईट एरियाचा सामाजिक व ऐतिहासिका आढावा - प्रकाश यादव व मीरा बोरवणकर लिखित अहवाल

१३. अहवाल / पुस्तके From Prostitution and Beyond: -an analysis of sex workers in Indiaया रोहिणी सहानी व व्ही. कल्याण शंकर लिखित अहवालातून

१४. अहवाल / पुस्तके पेशव्यांचे विलासी जीवन - डॉ. वर्षा शिरगावकर

* गोपनीयतेसाठी सेक्स वर्करची नावे बदललेली आहेत.





काळाच्या पडद्यावर लोकांचा अस्सल इतिहास उतरवण्यासाठी आत्तापर्यंत दबलेला आवाज ऐकणे महत्त्वाचे आहे. आपला वैविध्यपूर्ण भूतकाळ आत्मसात करून आपले भविष्य सृजनशील बनवण्यासाठी सेक्स वर्कर्स/ वेश्याव्यवसायातील व्यक्ती यासारख्या उपेक्षित लोकांचे मौखिक व्याख्यान हे इतिहासाचे समृद्ध स्त्रोत आहेत. समाजाच्या मुख्य प्रवाहाच्या इतिहासात अदृश्य आणि आवाज नसलेल्या लोकांचे जीवन ,धारणा आणि अनुभव प्रमाणित करणारा हा बुधवार पेठेचा मौखिक इतिहास कार्याच्या व्यापकतेमध्ये मौल्यवान भर घालणारा आहे.

**लक्ष्मी मूर्ती**

SANGRAM